रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ११०
www.ramprahar.com
बुधवार, ६ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## संजय वर्मा राज्याचे नवे पोलीस महासंचालक



**मुंबई :** राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वर्मा हे १९९०च्या तुकडीचे वरिष्ठ अधिकारी असून सध्या कायदा व तांत्रिक विभागाचे संचालक म्हणून कार्यरत होते. केंद्रीय निवडणूक आयोगाने पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तत्काळ बदली केली. त्यानंतर त्यांच्याकडील कार्यभार सेवाज्येष्ठतेनुसार मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे तात्पुरता देण्यात आला होता. या पदाची सूत्रे आता संजय वर्मा यांच्याकडे असणार आहेत. वर्मा हे मूळचे उत्तर प्रदेशचे असून त्यांच्याकडे तीन दशकांहून अधिक काळ पोलीस सेवेत काम करण्याचा अनुभव आहे. ते न्यायवैद्यक विज्ञानातील त्यांच्या कौशल्यांसाठी ओळखले जातात. त्यांनी न्यायवैद्यक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतलेत.

### अंतरंग

दिलीप भोईर यांचे भाजपमधून निलंबन/२
मतदानाच्या दिवशी आठवडा बाजार बंद ठेवण्याचे आदेश/५
'रोहित उपलब्ध नसल्यास बुमराहला कर्णधार करा'/८

# लाडक्या बहिणींसाठी जेलमध्ये जायला तयार

## मुख्यमंत्री शिंदेंनी विरोधकांना ठणकावले



**कल्याण : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. याचदरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कल्याण येथील शिवसेनेचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन मंगळवारी (दि. ५) करण्यात आले. या वेळी जनतेशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडीवर जोरदार निशाणा साधला. लाडक्या बहिणींसाठी मी एक वेळा नाही, तर दहा वेळा जेलमध्ये जायला तयार आहे, असे त्यांनी म्हटले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विश्वनाथ भोईर यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन झाले असे मी जाहीर करतो. कार्यालयाच्या उद्घाटनाला इतके कार्यकर्ते असतील तर प्रचाराला किती असतील याचा विचार करा. एवढे कार्यकर्ते समोरच्याचे डिपॉझिट जप्त केल्याशिवाय राहणार नाहीत.

इथे लाडक्या भावांपेक्षा लाडक्या बहिणी दिसत आहेत. माझ्या लाडक्या बहिणींना नमस्कार. भाऊबीज झाली. आता भाऊबीज दरवर्षी नाही तर दर महिन्याला मिळणार आहे. हे खाते सुरू ठेवायचे आहे ना? विरोधी पक्ष हे बंद करण्याच्या मागे लागले आहेत. ते म्हणाले, महाविकास आघाडीचे सरकार आले की, ज्या ११ योजना आपण सुरू केल्या या ११ योजनांची चौकशी सुरू करणार. यामध्ये जे दोषी अधिकारी आहेत, ज्यांनी सुरुवात केली म्हणजे आम्ही त्या सर्वांना जेलमध्ये टाकणार. लाडक्या बहिणींसाठी हा तुमचा लाडका भाऊ एक वेळा नाही, तर दहा वेळा जेलमध्ये जायला तयार आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

महाविकास आघाडीवाले लाडकी बहीण योजना बंद करण्यासाठी कोर्टात गेले, मात्र कोर्टाने त्यांना थप्पड दिली. आता हे लोक नागपूरमध्ये दुसऱ्या कोर्टात गेले आहेत, असे म्हणत मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.





# पनवेलमध्ये महायुतीचा झंझावात

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलला विकासाच्या दिशेने नेणारे कर्तृत्ववान आमदार प्रशांत ठाकूर चौथ्यांदा या विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्या अनुषंगाने भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, पीआरपी आणि मित्र पक्ष महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते जोमाने त्यांचा प्रचार करत असून मतदारांचा आशीर्वाद आमदार प्रशांत ठाकूर यांना मिळत आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचा झंझावाती प्रचार सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून नागझरी, ढोंगऱ्याचा पाडा, पालेखुर्द, देवीचापाडा, तोंडरे, पडघे, नावडे गाव, नावडे कॉलनी, खिडूकपाडा, टेंभोडे व वळवली गावात आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि. ४) प्रचार केला. त्यांचे रांगोळी काढून आणि औक्षण करून स्वागत करण्यात आले, तर ज्येष्ठांनी त्यांना विजयाचा आशीर्वाद दिला. युवकांनीदेखील जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला होता.

या प्रचारात भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, शशिकांत शेळके, मारूती चिखलेकर, युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, प्रभाग २चे अध्यक्ष कृष्णा पाटील, **(पान २ वर..)**

### पद्मशाली समाजाचा पाठिंबा

**पनवेल :** या विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना कामोठे येथील पद्मशाली समाजाने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेल विधानसभा मतदारसंघातून विजयाचा चौकार मारण्यासाठी मतदार बंधू, भगिनींच्या आशीर्वादाने सज्ज झाले आहेत. त्या अनुषंगाने पद्मशाली समाज कामोठे यांनी त्यांना आपला जाहीर पाठिंबा दिला.

या पाठिंबापत्रात पनवेल विधानसभा महायुतीचे लोकप्रिय, अधिकृत उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना आम्ही पद्मशाली समाज जाहीर पाठिंबा देत असून आमचा संपूर्ण समाज विरोधकांच्या कुठल्याही भूलथापांना बळी पडणार नाही, असे नमूद करून समाज १०० टक्के आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीशी ठामपणे असल्याची ग्वाही देण्यात आली आहे.

# 'उबाठा', शेकापचे कार्यकर्ते भाजपमध्ये

■ आमदार महेश बालदी यांच्याकडून स्वागत



**उरण : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाला जोरदार धक्का बसला आहे. या पक्षांच्या उरणमधील पदाधिकारी, उपसरपंच आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे आमदार महेश बालदी यांनी पक्षात स्वागत केले.

युवासेना तालुका अध्यक्ष हितेश विश्वनाथ पाटील यांनी 'उबाठा'ला अखेरचा जय महाराष्ट्र केला. त्याचप्रमाणे कोप्रोलीचे उपसरपंच अनंता दत्तात्रेय कोळी, गितेश धनंजय म्हात्रे, शेकापचे कार्यकर्ते मिलिंद पांडुरंग म्हात्रे, मिलिंद निळकंठ म्हात्रे यांनी शेकापला राम राम करत आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या विकासकामांवर प्रभावित होऊन भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रविशेठ भोईर, कामगार नेते जितेंद्र घरत, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, माजी जि.प. सदस्य विजय भोईर तसेच देवेंद्र पाटील, दत्ता म्हात्रे, गिरीश म्हात्रे, कोप्रोली शाखा अध्यक्ष सचिन गावंड, कल्पेश म्हात्रे, अश्विन म्हात्रे, सुदेश पाटील, कार्याध्यक्ष निलेश पाटील, अलंकार म्हात्रे, निखिल म्हात्रे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## केंद्रीय मंत्री अमित शाहांची तोफ उद्या धडाडणार!



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या सभांचे नियोजन करण्यात आले आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शाह यांची महाराष्ट्रातील पहिली सभा ७ नोव्हेंबर रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर दक्षिण मतदारसंघात होणार आहे.

भाजपकडून केंद्रीय मंत्री अमित शाहांच्या पहिल्या टप्प्यातील प्रचाराचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये ८ नोव्हेंबरला कोल्हापूर दक्षिण, जत (सांगली), कराड दक्षिण (सातारा) आणि खडकवासला व पर्वती (पुणे) त्यांच्या सभा होतील, तर तत्पूर्वी महायुतीचे आणखी एक स्टार प्रचारक उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभा ६ नोव्हेंबरला वाशीम, मूर्तझापूर, मोझरी-तिवसा येथे होणार आहेत.

## निवडक

### मल्लिकार्जून खरगे, राहुल गांधी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

**नागपूर :** काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी बुधवारी (दि. ६) महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. नागपुरात दुपारी १ वाजता संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहणार आहेत, तर सायंकाळी ५ वाजता त्यांच्या उपस्थितीत मुंबईच्या वांद्रे कुर्ला संकुलातील एमएमआरडीए मैदानात महाविकास आघाडीची महाराष्ट्र स्वाभिमान सभा होणार आहे.

### संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबर



**नवी दिल्ली :** संसदेचे १८वे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे, अशी माहिती संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. २६ नोव्हेंबर रोजी संविधानाच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त संयुक्त अधिवेशन होणार आहे. जुन्या संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये हे अधिवेशन होणार असून संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.



# पेणमध्ये बाप्पाच्या चरणी श्रीफळ वाढवून आमदार रविशेठ पाटील यांचा प्रचार सुरू

**पेण : प्रतिनिधी**

पेणची ग्रामदेवता म्हणजे कोल्हटकर वाड्यातील गणपती. पेण शहरात कोणतेही शुभकार्य करण्याअगोदर कोल्हटकर वाड्यातील बाप्पाचा आशीर्वाद घेतला जातो. त्यानुसार खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते या बाप्पा चरणी श्रीफळ वाढवून महायुतीचे उमेदवार व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचाराला मंगळवारी (दि. ५) पेण शहरात सुरुवात करण्यात आली.

या वेळी माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र ठाकूर, वैशाली कडू, ज्येष्ठ नगरसेविका सुनिता जोशी, शहेनाज मुजावर, ज्योती म्हात्रे, देवता साकोस्कर, धनश्री समेळ, माजी नगरसेवक अनिरूद्ध पाटील, पांडुरंग जाधव, शोमेर पेणकर, दर्शन बाफना, संतोष पाटील, अजय क्षीरसागर, किसान मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष परशुराम पाटील, सीताराम कांबळे, भाजप शहर अध्यक्ष हिमांशू कोठारी, राष्ट्रवादी युवती शहर अध्यक्ष मुस्कान झटाम, मिनाक्षी पाटील, पल्लवी कालेकर, सुप्रिया चव्हाण यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हटकर वाड्यातून प्रचाराची रॅली काढण्यात आली. पुढे महावीर मार्गावरून मिर्ची गल्लीमार्गे लाल बहादूर शास्त्री मार्गातून रॅली शहरात फिरवण्यात आली. या रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात व्यापारीवर्गही सहभागी झाला होता.

# खासदार शरद पवारांकडून निवृत्तीचे संकेत



**बारामती : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असतानाच ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख खासदार शरद पवार यांनी सूचक विधान करून संसदीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले आहेत. आतापर्यंत १४ निवडणुका लढल्या. त्यामुळे कुठे तरी थांबले पाहिजे, नव्या पिढीला पुढे आणले पाहिजे, असे पवार यांनी म्हटले आहे.

खासदार शरद पवार यांच्या राजकीय निवृत्तीबाबत राजकीय वर्तुळात अनेकदा चर्चा होत असतात. गेल्या वर्षी त्यांच्या निवृत्तीवरून झालेल्या नाट्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतंत्र होत संख्याबळाच्या मदतीने पक्षाचे नाव आणि चिन्हही मिळवले होते. दरम्यान, आता बारामती विधानसभा मतदारसंघातील एका प्रचारसभेमध्ये उपस्थितांना संबोधित करताना खासदार पवार म्हणाले की, मी सत्तेत नाही, राज्यसभेमध्ये आहे. माझा दीड वर्षांचा कार्यकाळ अद्याप शिल्लक आहे. या दीड वर्षांनंतर राज्यसभेत जायचे की नाही याचाही विचार मला करावा लागेल.

लोकसभा मी लढणार नाही. कसलीच निवडणूक लढणार नाही. किती निवडणुका लढायच्या. आतापर्यंत १४ निवडणुका लढल्यात. तुम्ही मला दरवेळी निवडून दिले. आता कुठे तरी थांबले पाहिजे, नव्या पिढीला पुढे आणले पाहिजे हे सूत्र घेऊन मी कामाला लागलो आहे. याचा अर्थ समाजकारण सोडणार नाही, असेही खासदार पवार यांनी सांगितले.

## अभिनेता भाऊ कदम राष्ट्रवादीचा स्टार प्रचारक



**मुंबई :** निवडणुकीच्या प्रचारासाठी विविध पक्षांकडून सिने कलाकारांना पाचारण केले जात आहे. ठाण्यात झालेल्या मनसेच्या सभेत शिवसेनेचे उपनेते शरद पोंक्षे हजर होते, तर आता 'चला हवा येऊ द्या' फेम भाऊ कदम हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रचार करणार आहे. भाऊ कदम या पक्षाचा अधिकृत स्टार प्रचारक असणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेतल्यानंतर त्याने याबाबत माहिती दिली. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# माथेरानच्या मिनीट्रेनची शीळ गुंजणार!

## आजपासून नेरळ-माथेरान-नेरळ वाहतूक सुरू



**वेळापत्रक (दररोज दोन फेऱ्या)**

- **नेरळहून पहिली फेरी :** नेरळहून सकाळी ८.५० वा. प्रस्थान व माथेरानला सकाळी ११:३० वा. आगमन
- **दुसरी फेरी :** नेरळहून सकाळी १०.२५ वा. प्रस्थान व माथेरानला दुपारी १.०५ वा. आगमन
- **माथेरानहून पहिली फेरी :** माथेरानहून दुपारी २.४५ वा. प्रस्थान व नेरळला सायंकाळी ५.३० वा. आगमन
- **दुसरी फेरी :** माथेरानहून सायंकाळी ४ वा. प्रस्थान व नेरळला सायंकाळी ६.४० वा. आगमन

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरानची राणी अर्थात मिनीट्रेनची पावसाळी सुट्टी संपली असून हिवाळी पर्यटन हंगामासाठी पुन्हा नव्या जोमाने मिनीट्रेन रूळावर येत आहे. स्थानिकांसह आबालवृद्ध पर्यटकांची नॅरोगेजवर चालणारी नेरळ-माथेरान-नेरळ लाडकी मिनीट्रेन बुधवार (दि.६) पासून प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.

माथेरानची मिनीट्रेन दरवर्षी पावसाळ्यातील चार महिने पर्यटक प्रवाशांसाठी बंद केली जाते. माथेरानच्या डोंगरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो तसेच दरडी कोसळण्याच्या भीतीने नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन बंद ठेवली जाते. साधारणपणे १५ जूनपासून मिनीट्रेन पावसाळी विश्रांती घेण्यासाठी जाते आणि पुन्हा १५ ऑक्टोबर रोजी प्रवाशांच्या दिमतीला येत असते. यंदा मात्र नेरळ-माथेरान नॅरोगेज मार्गावर सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामांमुळे मिनीट्रेन वेळेवर सुरू झाली नाही.

माथेरानची राणी रूळावर कधी येणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले असताना मध्य रेल्वेकडून नेरळ-माथेरान-नेरळ गाडी ६ नोव्हेंबरपासून सुरू होणार असे जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार माथेरान पर्यटन हंगामातील पहिली प्रवासी गाडी सकाळी मार्गस्थ होईल.

# रायगडात २० हजार ६६८ मतदार वाढले




**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रमानुसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यात नऊ हजार ३११ पुरुष, ११ हजार ३५५ महिला, तर दोन तृतीयपंथी अशा एकूण २० हजार ६६८ मतदारांची वाढ झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

रायगड जिल्ह्यातील सात मतदारसंघांमध्ये एकूण २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार आहेत. यामध्ये पुरुष १२ लाख ५९ हजार ५६७, महिला १२ लाख २९ हजार १३० आणि तृतीयपंथी ९१ मतदारांचा समावेश आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघात तीन लाख ४६ हजार ४०२ पुरुष, तीन लाख पाच हजार ५८६ महिला आणि ७४ तृतीयपंथी असे एकूण सहा लाख ५२ हजार ६२ मतदार आहेत. उरण मतदारसंघात एक लाख ७१ हजार ५२६ पुरुष, एक लाख ७० हजार ५६३ महिला आणि १२ तृतीयपंथी असे एकूण तीन लाख ४२ हजार १०१ मतदार आहेत. कर्जत मतदारसंघात एक लाख ५९ हजार २९३ पुरुष, एक लाख ५९ हजार ४४६ महिला आणि तीन तृतीयपंथी असे एकूण तीन लाख १८ हजार ७४२ मतदार आहेत.

पेण मतदारसंघात एक लाख ५४ हजार ६६१ पुरुष, एक लाख ५३ हजार ३१७ मतदार महिला आणि एक तृतीयपंथी असे एकूण तीन लाख सात हजार ९७९ मतदार आहेत. अलिबाग मतदारसंघात एक लाख ५० हजार ५४३ पुरुष, एक लाख ५५ हजार ६८६ महिला आणि एक तृतीयपंथी असे एकूण तीन लाख सहा हजार २३० मतदार आहेत.

श्रीवर्धन मतदारसंघात एक लाख २९ हजार ९१८ पुरुष आणि एक लाख ३५ हजार ३६८ महिला असे एकूण दोन लाख ६५ हजार २८६ मतदार आहेत. महाड मतदारसंघात एक लाख ४७ हजार २२४ पुरुष आणि एक लाख ४९ हजार १६४ महिला असे एकूण दोन लाख ९६ हजार ३८८ मतदार आहेत.

निवडणूक कार्यक्रमानुसार २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# बाळासाहेबांच्या विचारांवर चालणाऱ्यांना प्रॉपर्टी मिळणार!

## मंत्री दीपक केसरकर यांचे राज ठाकरे यांना प्रत्युत्तर

**सावंतवाडी : प्रतिनिधी**

बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालणाऱ्या लोकांनाच त्यांची प्रॉपर्टी मिळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांच्या विचारांवर चालतात म्हणून लोक त्यांच्याबरोबर राहिले, असे प्रत्युत्तर शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेला दिले.

मंत्री केसरकर पुढे म्हणाले की, सावरकरांचा ज्या वेळी अपमान झाला त्या वेळी बाळासाहेबांनी जोडो मारो आंदोलन सुरू केले होते. ते मंत्री मुंबईत पाऊल नाही टाकू शकले, ही बाळासाहेबांची ताकद होती. सावरकर यांच्याबद्दल राहुल गांधी यांनी काहीही बोलावे आणि आमच्या युवराजांनी त्यांना मिठी मारावी,



हे चित्रसुद्धा आमच्या जनतेने पाहिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सत्तेला लाथ मारून बाजूला गेले. सत्ता कोण सोडत नाही पण ते त्यांनी धारिष्ट्य दाखवले. शिवसेना ही बाळासाहेबांची मालमत्ता खरे आहे पण त्याच्या विचाराचे वारस शिंदे हेच आहेत. म्हणूनच लोकांनी आमच्यावर भरभरून प्रेम केले. बाळासाहेबांचे विचार सोडणाऱ्या बरोबर जनता राहत नाही हे लोकसभा निवडणुकीत बघितले आहे, असे प्रत्युत्तर मंत्री दीपक केसरकर यांनी मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांना दिले.

राज ठाकरे हे मोठे नेते आहेत. ते काय बोलले यावर माझ्यासारख्या छोट्या माणसाने बोलणे योग्य नाही, पण एकनाथ शिंदे यांनी सत्तेतून बाहेर गेले. लोक सत्ता सोडायला तयार नसतात, पण त्यांनी धाडस करून दाखवले. हा विचार वारसातूनच येत असतात, असा टोलाही त्यांनी राज ठाकरे यांना लगावला.

### ...त्यांची चौकशी करावी लागेल

सावंतवाडी मतदारसंघात सध्या काही अप्रवृत्ती आलेल्या आहेत त्यांना येथील जनतेने वेळीच घरी पाठवणे गरजेचे आहे. काही जणांवर जमीन घोटाळ्यांचे आरोप आहेत. अशांवर पोलिसांनी अद्यापपर्यंत कशी काय कारवाई केली नाही याची चौकशी करावी लागेल. जमिनीचे मोठे घोटाळे आहेत पोलिसांनी हे प्रकरण आर्थिक गुन्हा शाखेकडे पाठवले पाहिजे होते, पण तसे झाले नाही. सध्या निवडणुकीचा कालावधी आहे. त्यामुळे यावर आम्ही खोलात जात नाही, पण निवडणूक संपतात याबाबत चौकशी करण्याची मागणी करू, असेही मंत्री केसरकर म्हणाले.

# पेणमध्ये अवैध दारू वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकावर कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

दिवाळी पाडवानिमित्त पेण शहरात पेट्रोलिंग करीत असताना एक रिक्षा पडदे लावून आडमार्गाने जात असताना पोलिसांना दिसली. संशय आल्याने सहाय्यक फौजदार ढोबळे तसेच हवालदार बैकर यांनी रिक्षा थांबवू तपासणी केली असता रिक्षामध्ये अवैधरित्या देशीविदेशी दारुची विनापरवाना वाहतूक होत असल्याचे आढळून आल्याने रिक्षाचालकावर कारवाई करण्यात आली.

रिक्षेमधील आरोपी विनोद जनार्दन तांडेल (रा.कासारभाट–साई ता. पनवेल) व त्रिलोचन सुका ललाई (वय ३३,रा. खारपाडा नाका, पेण) यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून सुमारे ४६ हजार ६६० रुपये किमतीची दारु व रिक्षा (एमएच ४६ बीपी २३२०) असा एकूण एक लाख ९७ हजार ६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक वाघ, सहाय्यक फौजदार ढोबळे, हवालदार बैकर यांनी केली. अधिक तपास सहाय्यक फौजदार ढोबळे हे करीत आहेत.



# अभिनेता भाऊ कदम बनला राष्ट्रवादीचा स्टार प्रचारक

**मुंबई : प्रतिनिधी**

निवडणुकीच्या प्रचारासाठी विविध पक्षांकडून सिने क्षेत्रातील कलाकारांना पाचारण केले जात आहे. ठाण्यात झालेल्या मनसेच्या सभेत शिवसेनेचे उपनेते शरद पोंक्षे हजर होते, तर मंगळवारपासून चला हवा येऊ द्या फेम भाऊ कदम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रचार करणार आहे. भाऊ कदम या पक्षाचा अधिकृत स्टार प्रचारक असणार आहे, परंतु त्याने अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेला नाही. उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेतल्यानंतर त्यांनी याबाबत माहिती दिली.

भाऊ कदम म्हणाले की, अजित पवारांबरोबर माझी सदिच्छा भेट झाली. अजित पवार कलाकारांना मान देणारे आणि त्यांचे प्रश्न सोडवणारे नेते आहेत. त्यांनी आताच अनुदानाचा



प्रश्न सोडवला. कलाकारांच्या समस्या पूर्णत्वास न्यायचे असतील तर ते चांगले मार्गदर्शक आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचाराला जायला काहीच हरकत नाही. त्यांनी आमच्यासाठी केले आहे तर आम्हीही त्यांच्यासाठी प्रचार करणार आहोत.

अजित पवारांना भेटल्यानंतर त्यांनी मलाच चला हवा येऊ द्या किस्से सांगितले. आमचे व्हिडिओ पाहून खूश होतात असे म्हणाले. त्यानंतर आम्ही गप्पाही मारल्या, असे भाऊ कदम म्हणाले.

# दिलीप भोईर यांचे भाजपमधून निलंबन

## खासदार धैर्यशील पाटील यांची माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवून भाजपचे बंडखोर उमेदवार दिलीप भोईर यांचे पक्षातून निलंबन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

या वेळी भाजपचे जिल्हा संघटक सतीश धारप, जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते, गिरीश तुळपुळे उपस्थित होते. दिलीप भोईर यांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघातून बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पक्षश्रेष्ठींकडून त्यांना अर्ज मागे घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि सार्वजनिक



बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पक्षादेश डावलून त्यांनी अर्ज कायम ठेवला. त्यामुळे भोईर यांचे पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात येत असल्याचे खासदार धैर्यशील पाटील यांनी जाहीर केले.

आमदार महेंद्र दळवी हेच महायुतीचे अधिकृत उमेदवार असतील आणि पक्षाचे पदाधिकारी पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहतील, असा विश्वासही त्यांनी या वेळी व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी वैयक्तिक हेवेदावे बाजूला ठेवून महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, अन्यथा त्यांच्यावरही कारवाई होऊ शकेल, असा इशारा पाटील यांनी दिला.

# निवडणूक आचारसंहितेमध्ये साताऱ्यात एक कोटी जप्त

**सातारा : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर साताऱ्यातील शेंद्रे येथे एक कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. पुणे–बंगळुरू महामार्गावर सातारा तालुका पोलिसांची ही मोठी कारवाई केली. कारमधून हे पैसे घेऊन जात होते. हे पैसे कोणासाठी आणि कुठून घेऊन जात होते, याचा तपास पोलीस करीत आहेत.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात ठिकठिकाणी चेकपोस्ट लावण्यात आले आहे. पोलीस प्रत्येक वाहनाची तपासणी करीत आहेत. साताऱ्यामध्ये पोलिसांना एका कारमधून मोठी रक्कम घेऊन जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारची तपासणी केली तेव्हा त्यांना कारमध्ये एक कोटी रुपये आढळून आले. पोलिसांनी ही रक्कम जप्त केली. सातारा तालुक्यातील शेंद्रे येथे ही कारवाई करण्यात आली आहे. हे पैसे नेमके कोणाचे आहेत याचा तपास सुरू आहे. पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांनी ही कारवाई केली.

सोमवारी बुलडाणा शहर पोलीस शहरातील कारंजा चौक येथे वाहन तपासणी करीत होते. या वेळी एका दुचाकीमध्ये २० लाख रुपयांची रोख रक्कम मिळून आली. तातडीने पोलिसांनी ही रक्कम जप्त केली. संबंधित व्यक्तीलासुद्धा पोलिसांनी ताब्यात घेतले. सध्या या व्यक्तीची चौकशी सुरू आहे, तसेच पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# कोल्हापूरमध्ये अपक्ष उमेदवार राजेश लाटकर यांना काँग्रेसचा पाठिंबा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून अर्ज दाखल केलेले उमेदवार राजू लाटकर यांना काँग्रेसने पाठिंबा दिलेला आहे. काँग्रेसच्या मंगळवारी (दि.५) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी सोमवारी अनपेक्षितरित्या माघार घेतल्यानंतर काँग्रेस पक्षासमोर या मतदारसंघात उमेदवारीचा प्रश्न निर्माण झाला होता. कोल्हापूर उत्तर मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार राजेश क्षीरसागर विरूद्ध काँग्रेस पुरस्कृत राजू लाटकर यांच्यात थेट लढत होईल.

### शाहू छत्रपती यांची घोषणा

कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांनी लाटकर यांना पाठिंबा देण्याचा प्रस्ताव मांडला, याला शिवसेना ठाकरे गटाचे नेते विजय देवणे यांनी अनुमोदन दिले. आमदार सतेज पाटील यांनी प्रास्ताविक केले. काँग्रेसने पाठिंबा जाहीर केल्याबद्दल राजू लाटकर यांनी आभार मानले. काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्याला नाराज करून निवडणूक लढवणे मान्य नसल्यामुळे कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून मधुरिमाराजे छत्रपती यांची उमेदवारी मागे घेण्यात आली, असे स्पष्टीकरण खासदार शाहू छत्रपती यांनी दिले आहे.

सतेज पाटील हे कोल्हापूर जिल्ह्याचे काँग्रेसचे नेते आहेत. राज्यपातळीवर नेते म्हणून ते उत्तम काम करीत आहेत. त्यांना ताकद देणे ही आमची जबाबदारी आहे. त्यामुळे राजेश लाटकर यांच्यासह जिल्ह्यातील काँग्रेसच्या अन्य चार जागा तसेच महाविकास आघाडीच्या सर्व जागा जिंकण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत, असेही शाहू छत्रपती यांनी स्पष्ट केले.

# निवडणूक निर्भय होण्यासाठी सहकार्य करावे –रुही खान

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या सामान्य निवडणूक निरीक्षक (भा.प्र.से) रुही खान यांनी केले.

अलिबाग येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील सभागृहात मंगळवारी (दि.५) अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप, आचारसंहिता व खर्चाबाबत मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उमेदवारांना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम पाटील, रोशन शिंदे उपस्थित होते. या वेळी रुही खान यांनी




सांगितले की, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तयारी केली आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करत निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उमेदवारांनी प्रशासनाला सहकार्य करावे. निवडणूक प्रचार करतांना आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी.

प्रचाराकरीता एक खिडकी समितीकडून परवानगी घेणे अत्यंत आवश्यक आहे. कोणीही परवानगीशिवाय प्रचार सभा, गाड्यांवरील रॅली इ. करू नये. कोणताही पक्ष किंवा उमेदवार, ज्यामुळे विद्यमान मतभेद विकोपास जातील किंवा परस्परात द्वेष निर्माण होईल किंवा भिन्नभिन्न जाती व समाज, धार्मिक वा भाषिक यांच्यामध्ये तणाव उत्पन्न होईल असे कोणतेही कार्य करणार नाही. आर्दश आचारसंहितेचे सर्व नियम अटी पाळावेत.

मतदान शांततापूर्ण व सुव्यवस्थित होत असल्याची आणि मतदारांना कोणताही उपद्रव न होता किंवा अडथळा न येता त्यांचा मताधिकार वापरण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळत असल्याची खातरजमा करण्यासाठी, मतदानाच्या कामावर असलेल्या अधिकाऱ्यांबरोबर सहकार्य करतील, त्यांच्या प्राधिकृत कार्यकर्त्यांना योग्य ते ओळखपत्रे द्यावी. मतदार वगळता, निवडणूक आयोगाकडून मिळालेला विधीग्राह्य पास ज्याच्याजवळ नाही अशी कोणतीही व्यक्ती मतदान मंडपात प्रवेश करणार नाही. मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत पूर्ण होणाऱ्या ४८ तासांच्या कालावधीत जाहीर सभा घेण्यास मनाई असेल, असेही खान यांनी सांगितले.

उमेदवारानी त्यांची दैनंदिन नोंदवही संपूर्ण प्रचार कार्यकाळात खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे. निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला, निर्वाचित उमेदवाराच्या निवडणूकीच्या ३० दिवसांच्या आत सादर कारावयाचा असतो. उमेदवारासांठी स्वतंत्र निवडणूक खर्च नोंदवही असणे आवश्यक आहे, अशा सूचना दिल्या.

पान १ वरुन

### पनवेलमध्ये महायुतीचा झंझावात

नारायणशेठ पाटील, सुरेशशेठ खानावकर, वासुदेवशेठ पाटील, महेश पाटील, अशोक पाटील, श्रीनाथ पाटील, शुभम खानावकर, आशिष कडू, पवन भोईर, भारत म्हात्रे, समीर गोंधळी, सागर भोईर, गौरव भोईर, अशोकशेठ साळुंखे, काळूरामशेठ फडके, महेंद्र म्हात्रे, आकाश फडके, करण फडके, रामदासशेठ फडके, सुदेश फडके, विशाल खानावकर, मदन खानावकर, रूपेश खानावळ, रूपेश खानावकर, प्रशांत खानावकर, राम म्हात्रे, संतोष म्हात्रे, राजेश पाटील, जितू काटकर, आनंद सोनवणे, रवींद्र खानावकर, राकेश खानावकर, विनीत खानावकर, धीरज खानावकर, स्वराज खानावकर, रामबुवा खुटारकर, तुषार खानावकर, प्रभाकर खानावकर, तुकाराम खानावकर, महेश म्हात्रे, रोहित उलवेकर, प्रेमनाथ खानावकर, गजानन पाटील, केटी भोईर, दिलीप भोईर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# राज्यात सहा लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदार

**मुंबई** : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण सहा लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये तीन लाख ८४ हजार ६९ पुरुष मतदार, दोन लाख ५७ हजार ३१७ महिला दिव्यांग मतदार, तसेच ३९ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.



पुणे जिल्ह्यात सर्वाधिक दिव्यांग मतदार आहेत. पुणे येथे ८८ हजार ९३७ दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये ४८ हजार ६२६ पुरुष, ४० हजार ३०१ महिला आणि १० तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. पुणे पाठोपाठ ठाणे जिल्ह्यात ३८ हजार १४९ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये २१ हजार ५७३ पुरुष मतदार, १६ हजार ५७३ महिला मतदार आणि तीन तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत.

दिव्यांग मतदारांची सर्वात कमी नोंदणी गडचिरोली जिल्ह्यात आहे. येथे सहा हजार ४३ दिव्यांग मतदारांची नोंद आहे. यामध्ये तीन हजार ७१० पुरुष आणि दोन हजार ३३३ महिला दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

राज्यात तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची एकूण संख्या ३९ आहे. सर्वाधिक तृतीयपंथी दिव्यांग मतदार औरंगाबाद जिल्ह्यात आहेत. एकूण १२ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. पुणे त १०, नांदेड सहा, ठाणे जिल्ह्यात तीन आणि पालघर व जळगाव जिल्ह्यात प्रत्येकी दोन तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. याशिवाय मुंबई उपनगर, लातूर, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक तृतीयपंथी दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत.

# दिवाळीच्या चार दिवसांत ३१ प्राणी, पक्षी जखमी

## फटाके मुळावर; पर्यावरणवादी, पक्षीप्रेमींमधून नाराजीचा सूर

**मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी लहानथोरांना आनंद देते, मात्र त्यातून निघणाऱ्या धूर आणि आवाजाने जिथे माणसांनाही असह्य त्रास होतो. दिवाळीच्या चार दिवसांत मुंबई आणि परिसरात फटाक्यांच्या धुराचा त्रास झाल्याने, भाजल्याने ३१ प्राणी जखमी झाले आहेत. यामध्ये आठ श्वानांचा तर २३ पक्ष्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत यंदा प्राणी व पक्षी जखमी होण्याच्या घटनेत काही प्रमाणात घट झाली आहे.

दिवाळीला ३१ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली. दिवाळीनिमित्त नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले. फुलबाजा, भुईचक्र, सुतळी बार, रॉकेट असे विविध प्रकारचे फटाके फोडताना झालेल्या वायू प्रदूषणामुळे मुंबईतील हवेची गुणवत्ता प्रचंड खालावली, तसेच ध्वनी प्रदूषणाने अनेक नागरिकांना त्रास झाला आहे. या त्रासातून प्राणी आणि पक्षीसुद्धा सुटले नाहीत.



गेल्या चार दिवसांत मुंबईमध्ये ३१ प्राणी आणि पक्षी जखमी झाले आहेत. दिवाळीनिमित्त फोडण्यात आलेल्या फटाक्यांमुळे प्रचंड धूर निर्माण झाला. या धुरामुळे पक्ष्यांना श्वसनाचा त्रास होऊन त्यांना दुखापत झाली आहे. श्वसनाचा त्रास झाल्याने जखमी झालेल्यांमध्ये १५ कबुतरे, सहा घारी आणि दोन घुबड यांचा समावेश आहे. तसेच आठ श्वान जखमी झाले असून यातील अनेक श्वानांना श्वसनाचा त्रास झाला, तर काही श्वानांच्या पाठीवर फटाके फोडण्यात आले. त्या श्वानांना भाजलेल्या अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या सर्व जखमी श्वान आणि पक्ष्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. किरकोळ जखमी झालेल्या पक्षी आणि श्वानांवर उपचार करून त्यांना सोडण्यात आले, तर गंभीर जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती परळ येथील दी बाई साकरबाई दिनशॉ पेटिट हॉस्पिटल फॉर ॲनिमल रुग्णालयाचे व्यवस्थापक डॉ. मयूर डांगर यांनी दिली.

## निवडक

### झोमॅटो डिलेव्हरी बॉय बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून झोमॅटो डिलेव्हरी बॉयचे काम करण्यासाठी गेलेला एक व्यक्ती अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. हमीदउल्ला जाऊल्ला खा (४५ रा.फर्शिपाडा, सेक्टर ३४, खारघर) असे या व्सक्तीचे नाव असून रंग सावळा, उंची अंदाजे पाच फुट सहा इंच, अंगाने मध्यम, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे काळे असून अंगात गुलाबी हाफ शर्ट व हाफ पॅन्ट, पायात निळी चप्पल, मानेवर डाव्या बाजूस जुनी जखम व डाव्या कानावर कट झालेली खुण आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार नितीन आखाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### निवडणूक प्रचार गीत लाँच



**पनवेल :** शिवसेनेची मशाल आहे आमुच्या हाती या मशाल प्रचार गीताचे लाँचिंग शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव विनायक राऊत यांच्या हस्ते शिवसेना भवन मुंबई येथे करण्यात आले. शिवसेना उबाठा खारघरप्रमुख गुरुनाथ पाटील यांनी निर्मिती केलेल्या व गीतकार प्रणाली पाटील यांच्या माध्यमातून बनविण्यात आलेल्या मशाल प्रचार गीताचे लाँचिंग करण्यात आले. या वेळी नंदिनी सुनील वाळके, सुरेखा जगन्नाथ सोनार, पुष्पा जाधव, मोनिका जगताप, सुनील वाळके, जग्गनाथ सोनार, सचिन ठाकूर, संदीप माने, शुभम ठाकूर, दत्ता दळवी, विशाल कावडे, संतोष गायकवाड, राजेश बेर्डे, अमित राणे, महादेव हिमने, प्रदीप पाटील, देवदास पाटील, संतोष पाटील, मिथुन पळसामकर, सुयोग ठाकूर आदींचे सहकार्य लाभले.

### खारघरमधून एक जण बेपत्ता



**पनवेल :** खारघर परिसरातून एक व्यक्ती राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सिद्धार्थ कांबळे (२५ रा.खारघर) असे या व्यक्तीचे नाव असून अंगाने सडपातळ, रंग सावळा, उंची सहा फूट एक इंच, चेहरा उभट, केस काळे, डोळे बारीक, नाक सरळ असून अंगात पिझा हॉट कंपनीचा टी-शर्ट व निळी पॅन्ट तसेच पायात काळे शुज आहेत. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने खारघर पोलीस ठाणे किंवा हवालदार पी.पी.पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वावंजे गावात भंगार व्यावसायिकाची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील वावंजे गावात राहणाऱ्या याकुब युनुस खान (वय ६०) या भंगार व्यावसायिकाची त्याच भागात राहणाऱ्या श्रीकांत राम अकबल तिवारी या रिक्षाचालकाने धारदार हत्याराने भोसकून तसेच गळा आवळत हत्या करून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे.

२ नोव्हेंबर रोजी याकुब खान यांचा मृतदेह मोरबे गावालगच्या झुडपांमध्ये आढळून आल्यानंतर हत्येचा प्रकार उघडकीस आला. त्यानुसार पनवेल तालुका पोलिसांनी आरोपी श्रीकांत तिवारी याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, आरोपीच्या अटकेनंतर या हत्येमागील कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. मृत याकुब युनुस खान पनवेल तालुक्यातील वावंजे गावात राहण्यास असून त्यांचा भंगार खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. २६ ऑक्टोर रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास ते आपल्या घरातून टिव्हीएस ज्युपिटर स्कुटीवरून बाहेर पडले होते, मात्र ते त्यादिवशी उशीरापर्यंत घरी न परतल्याने त्यांचा मुलगा इम्रान यावुब खान याने त्यांचा सर्वत्र शोध घेऊन २७ ऑक्टोबर रोजी पनवेल तालुका पोलीस



ठाण्यात वडील याकुब खान बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पनवेल तालुका पोलिसांनी बेपत्ता याकुब खान यांचा शोध घेण्यासाठी २९ ऑक्टोबर रोजी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली होती.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये मृत याकुब खान २६ ऑक्टोबर रोजी आपल्या स्कुटीवरुन वावंजे गावातील संशयित आरोपी श्रीकांत तिवारी याच्यासोबत मोरबे गावाच्या दिशेने जाताना निदर्शनास आले. त्यानंतर सुमारे एक तासाने श्रीकांत तिवारी त्याच स्कूटीवरून फक्त एकटाच परत आल्याचे आढळून आले. त्यानंतर श्रीकांत तिवारी याने याकुब खान यांची स्कुटी महोदर येथील तळ्यामध्ये टाकून पलायन केले. पोलिसांनी मृत याकुब खान यांच्या स्कुटीचा शोध घेतला असता, ती महोदर येथील तळ्यात आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी श्रीकांत तिवारी याचा शोध घेतला असता, तो आपल्या घरातून पळून गेल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांकडून फरार श्रीकांत तिवारी याचा शोध सुरू असताना, २ नोव्हेंबर रोजी मोरबे गावच्या हद्दीत अग्रवाल फार्म, कुंभारखोती येथील पायवाटे जवळ गवतामध्ये यावुब खान यांचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. पनवेल तालुका पोलिसांनी हा मृतदेह ताब्यात घेऊन पनवेल उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केले.

शवविच्छेदनात याकुब खान यांच्या पाठीत धारदार हत्याराने भोसकून तसेच त्यांचा गळा आवळून हत्या करण्यात आल्याचा अहवाल वैद्यकिय अधिकाऱ्यांनी दिला. यावरून आरोपी श्रीकांत तिवारी यानेच याकुब खान यांची हत्या करून पलायन केल्याचे आढळून आल्यानंतर पनवेल तालुका पोलिसांनी त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

# कळंबोलीत महायुतीची प्रचार रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीमध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारासाठी काढण्याता आलेल्या भव्य प्रचार रॅलीला जनतेचा जोशपूर्ण प्रतिसाद लाभला. रॅलीतील नागरिकांची उपस्थिती ही आमदार प्रशांत ठाकूरांच्या विकास कार्यावर असलेला जनतेचा अटूट विश्वास आणि समर्थनाचे प्रतीक ठरली.



नेहमीच विकसाचे राजकारण करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांचा विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने झंझावाती प्रचार दौरा सुरू आहे. त्यानुसार संपुर्ण प्रभाग ७ मध्ये भव्य प्रचार रॅली सोमवारी काढण्यात आली होती. या प्रचार रॅलीला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला तसेच तरुणांसह ज्येष्ठनागरीकांनी या रॅलीत सहभाग घेतला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांना पनवेल विधनसभा मतदार संगातून चौथ्यांदा बहुमताने विजयी करण्यासाठी येत्या २० तारखेला कमळा समोरील बटण दाबून विजयी करण्याचे आवाहन मतदारांना करण्यात आले.

या रॅलीवेळी शिवसेनेचे पनवेल जिल्हा प्रमुख रामदार शेवाळे, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, पनवेल महापालिकचे माजी नगरसेवक अमर पाटील, राजू शर्मा, दक्षिण भारतीय सेलचे सह संयोजक रमेश नायर, मंडळ सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष केशव यादव, महिला मोर्चा अध्यक्षा मनीषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, प्रभाग अध्यक्ष चितरंजन शेट्टी, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, यांच्यासह सर्व सेक्टर प्रमुख आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## हर्षल म्हात्रेने रेखाटली शिवरायांची रांगोळी

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील खोपटे येथील हर्षल धनेश्वर म्हात्रे याने खोपटे येथील त्याच्या निवासस्थानी दिवाळीनिमित्ताने छत्रपती शिवरायांचे, रांगोळीच्या चित्रातून सुंदर रूप साकारले आहे.




हर्षल म्हात्रे हा उरण तालुक्यातील प्रसिद्ध नाटककार व प्रख्यात चित्रकार धनेश्वर म्हात्रे यांचा सुपुत्र असून, तो अकरावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी आहे. त्याने शालेय, तालुका व जिल्हा चित्रकला स्पर्धेत अनेक पारितोषिके पटकावली आहेत. दी.बा. पाटील एक चळवळ या स्पर्धेतील, चित्रकला स्पर्धेत तो द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. हर्षल म्हात्रे याच्या कला कौशल्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



**पनवेल :** तालुका पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी गजानन घाटगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी अभिनंदन केले.



**खारघर :** येथे महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रचार केला.

# पनवेलमध्ये भात कापणीला सुरुवात

**खारघर : प्रतिनिधी**

एकीकडे पावसाने भात पिकाची धूळधाण केल्यानंतर आता उघडीप दिल्याने पनवेलमध्ये भात कापणीला सुरुवात झाली आहे.

भात कापणीबरोबर भाताची बांधणी केली जाते. त्यानंतर मळणी किंवा काही शेतकरी रचून ठेवतात आणि त्यानंतर सवडीने मळणी करून घरी आणतात. आता सद्यस्थितीत भात कापणी आणि बांधणी ही दोन मुख्य कामे सुरू आहेत. त्यामुळे ऐन दिवाळीतही शेतकरी शेतात असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे यंदाचा पावसाळा लांबल्याने अद्यापही काही शेतात पाणी असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

तालुक्यात यावर्षी ५९९० हेक्टरवर भातशेती करण्यात आली होती, मात्र परतीच्या पावसात मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले. यामध्ये १०० हेक्टरपेक्षा जास्त भातशेतीचे नुकसान झाले आहे. अद्यापही



अनेक ठिकाणचा पंचनामा झाला नसल्याने नुकसान भरपाईचा अहवाल समोर आलेला नाही. यंदा भात पिकाला पोषक वातावरण होते, मात्र पीक ऐन भरात असताना पावसाने धुमाकूळ घातला. आणि भात शेतीचे झोडपून काढली. शेतीच्या कामासाठी शोधूनही मजूर मिळत नाहीत. मजूर मिळाल्यास त्यांच्या मर्जीनुसार मजुरी द्यावी लागत आहे. गेल्या काही वर्षांपासून भात कापणीसाठी यंत्राचा वापर करण्यावर भर दिला जात आहे. मात्र हे यंत्रही अपुरे पडत असल्याचे चित्र आहे. परिणामी प्रति एकर लागवडीचा खर्चही वाढलेला आहे.

### मजुरीचा वाढता खर्च

*सद्यःस्थितीत शेतकरी हलके धान कापणी तसेच बांधणीच्या कामात व्यस्त आहेत. धान कापणीसाठी महिला मजुरांना ४०० ते ५०० रुपये मोजावे लागत आहेत, तर बांधणीसाठी पुरुषांना प्रतिदिन ६०० ते ७०० रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे भातशेती जर जास्त असेल शेतकऱ्यांना कापणी आणि बांधणीचा खर्च न परवडणारा आहे. त्यातच मजुरांची टंचाई असल्याने अधिक वेळ खर्ची जात आहे.*

# स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी! पनवेल महापालिकेकडून सर्व प्रभागांमध्ये मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्यावतीने चारही प्रभागांमध्ये दिवाळीच्या पार्श्वभूमीवर 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

दिवाळी सणांदरम्यान नागरिक विविध प्रकारचे साहित्य मोठ्या प्रमाणात खरेदी करीत असल्याने बाजारपेठा व दुकाने, मॉल्स याठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती. त्यामुळे कचऱ्याच्या प्रमाणातही वाढ होत असते. या अनुषंगाने 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या मोहिमेचा मुख्य भाग म्हणून उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल या चारही प्रभागांमध्ये विशेष स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. या मोहिमेंतर्गत सुमारे चार हजार ८५५ टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

नरक चर्तुदशी, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज या दिवशी फटाके वाजविण्याचे प्रमाण जास्त असल्याने आयुक्तांच्या सूचनेनूसार सखोल स्वच्छता मोहिम घेऊन चारही प्रभागामध्ये स्वच्छता घेण्यात आली. या मोहिमेसाठी विशेष अशा १५० सफाई कर्मचाऱ्यांचे पथक बनविण्यात



आले आहे. २४ ऑक्टोबर रोजी सुरू झालेली ही मोहिम २९ ऑक्टोबरपर्यंत राबविण्यात आली.

या मोहिमेंतर्गत चारही प्रभागातील मुख्य बाजारपेठ आणि आठवडे बाजार भरणाऱ्या ठिकाणी संपूर्ण स्वच्छता करण्यात आली तसेच भाजी विक्रेत्यांना दोन डस्टबीन देण्यात आले तसेच बाजारपेठ आणि भाजी व फळ वित्यांमध्ये प्लास्टिकबंदी विषयी जनजागृती करण्यात आली. 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या मोहिमेंतर्गत स्वच्छ उद्यान अभियान राबविण्यात आले. यामध्ये चारही प्रभागातील सार्वजनिक उद्याने, बागा आणि खेळाच्या मैदानांची संपूर्ण सफाई करण्यात आली. उद्याने, गार्डन आणि खेळाच्या मैदानाच्या परिसरातील अथवा प्रवेश रस्त्यावरील डेब्रिज उचलण्यात आले.

दिवाळीपूर्वी घरोघरी साफसफाई केली जाते. या वेळी अडगळीतील परंतु सुस्थितीतील कपडे, चपला, बूट, पुस्तके, स्कूलबॅग इत्यादी वस्तू कचऱ्यात फेकण्यात येतात, अशा सुस्थितीतील वस्तू आरआरआर (रिसायल, रियुझ, रिड्युस) केंद्रामध्ये जमा करण्याबाबत महापालिकेच्यावतीने आवाहन करण्यात आले होते. या आवाहनला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला, या माध्यमातून जमा झालेल्या वस्तूंचे गरजूंना वाटप करण्यात आले.

'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या मोहिमेंतर्गत रस्ते दुभाजक आणि फूटपाथची सखोल स्वच्छता मोहीम घेण्यात आली. यामध्ये चारही प्रभागातील मुख्य चौक, मुख्य रस्ते आणि महामार्ग यांचे दुभाजक मधील आणि फूटपाथ वरील गवत काढण्यात आले.

### चौक व रस्त्यांची प्रामुख्याने सफाई

'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी सखोल स्वच्छता मोहीम' अंतर्गत चारही प्रभागांमधील मुख्य चौक, महामार्ग, प्रमुख रस्ते यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. तसेच चारही प्रभागातील मुख्य चौक जसे की उत्सव चौक, शिल्प चौक अशा विविध चौकांमधील मुख्य रस्त्यांचे फूटपाथ तसेच पुतळे, महामार्ग स्प्रे जेटिंग मशीनद्वारे स्वच्छ करण्यात आले.

# शांतीवनच्या रुग्णांसोबत दिवाळी साजरी

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूडमधील समता महिला मंडळाने शांतीवन नेरे येथील कुष्ठरुग्णांसोबत दिवाळी साजरी केली. रुग्णांना कपडे, फराळाचे वितरण करण्यात आले. तसेच या व्यतिरिक्त समता महिला मंडळाच्या एका जेष्ठ सदस्यानी कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन यांना एक लाख रूपयांचा धनादेश देणगी म्हणून दिला.

या वेळी मंडळाच्या अध्यक्ष फुलन शिंदे, गीतांजली जोशी, वनिता पाटील, गीता वैती, भारती शिंदे, धनश्री माळी, अशुराणी टाकसाळे, सुरेखा इंगळे व इतर सदस्या उपस्थित होत्या



महिला मंडळाच्या अध्यक्ष फुलन शिंदे व सर्व सभासदांच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी कुष्ठ रुग्णांसोबत व वंचितांबरोबर दिवाळी साजरी केली जाते. नेरे येथील शांतीवनमध्ये उपचार घेणारे ३० रुग्ण व पुनर्वसित ३० महिलांना नवीन कपडे, साड्या, दिवाळी फराळ व इतर अत्यावश्यक वस्तू देवून रुग्णांसोबत आनंदात दिवाळी साजरी करण्यात आली.

रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधानाची भावना निर्माण झाली होती. यावेळी रुग्णांच्या व्यथा जाणून घेण्यात आल्या तसेच रुग्णांशी चर्चा करता त्यांचे विचार ऐकून घेण्यात आले. त्यांना दिलासा देत संस्था सदैव आपल्या सोबत राहील, असे आश्वासन देण्यात आले.

# शैक्षणिक साहित्य, साडीवाटपासह स्नेहभोजन

## संवेदना फाउंडेशनतर्फे उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय सैन्यदलातील शौर्यचक्र विजेते युद्धवीर मधुसूदन सुर्वे आणि लेफ्टनंट कर्नल संतोष मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल शांतीवन येथील कुष्ठरोगी आणि वृद्ध बांधवांसमवेत सहभोजन, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, महिलांना साडीवाटप करून संवेदना फाउंडेशनतर्फे दिवाळी साजरी करण्यात आली.



या वेळी मराठा मंदिरचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख, माजी पोलीस निरीक्षक अविनाश सोनकर, कस्टम अधिकारी सत्यवान रेडकर, कुष्ठरोग समितीचे सामाजिक कार्यकर्ते संतोष ढोरे, संवेदना फाउंडेशनचे अध्यक्ष विनोद चाळके, ॲड. रंजना खोचरे, गायक किशोर गवांदे, पोलीस निरीक्षक रवींद्र दुशारेकर, सिने अभिनेत्री ईश्वरी शेट्ये, अभिनेता मितेश आगणे, सहारा अकादमीचे एस पवार, शांतीवनचे सीईओ नंदवुमार उरणकर, सामाजिक कार्यकर्ते एकनाथ भिसे, राजेन्द्र वोरा आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शौर्यचक्र विजेते युद्धवीर मधुसूदन सुर्वे आणि लेफ्टनंट कर्नल संतोष मोरे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार श्रीकांत जाधव यांनी केले. करुणेश्वर वृद्ध आश्रमातील बांधवांना भेट देऊन त्यांच्या समवेत गाणी सादर करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे उपाध्यक्ष अमोल खैरे, अशोक राजपुरोहित, कमलेश कुबल, कुष्ठरोग समितीचे संतोष ढोरे, ईश्वर, करुणा ढोरे यांनी अथक परिश्रम घेतले. सदर उपक्रमासाठी मुंबईसह दापोली मंडणगड आणि रत्नागिरी येथून मोठ्या संख्येने संवेदना फाउंडेशनचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

# मविआचा कांगावा

राज्यातील जनतेने युती सरकारला दिलेला जनादेश धुडकावून स्थापन झालेल्या महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात तसेच त्याही आधी २०११ ते २०१४ सालापर्यंत राज्यात असलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात राज्याच्या हितासाठी ठोस निर्णय घेतले न गेल्याने महाराष्ट्राची अधोगती सुरू झाली, परंतु महायुती सरकारने सत्ता हाती येताच पुन्हा प्रयत्नपूर्वक महाराष्ट्राला आपल्या नेहमीच्या अव्वल स्थानाकडे झेप घेण्यासाठी बळ दिले. असे असताना पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीच्या अलीकडच्या एका अहवालाचा वापर करून दिशाभूल व अपप्रचार करण्याचा प्रयत्न मविआच्या नेत्यांनी चालवला आहे.

**पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीने सुमारे महिनाभरापूर्वी एक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालाविषयीचे वृत्त आता ऐन निवडणुकांच्या धामधुमीत प्रसिद्ध झाल्याने स्वाभाविकपणे विरोधकांकडून त्याचा आपले राजकारण साधण्यासाठी वापर होतो आहे, परंतु अहवालातील आकडेवारी समोर आणत महायुतीच्या नेत्यांनी महाविकास आघाडीला सडेतोड उत्तर दिले आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेपासूनच अन्य राज्यांपेक्षा सर्वच बाबतीत पुढे राहिले आहे. परंतु पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीने अलीकडे दिलेल्या एका अहवालात महाराष्ट्र राज्याचा जीडीपी तसेच दरडोई उत्पन्न या दोन्हींमध्ये घट झाल्याचे नमूद केले आहे, परंतु ही घट विद्यमान महायुतीच्या कार्यकाळातील नसून त्याआधीच्या महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात जीडीपी कमी होता. तो महायुती सरकारच्या कार्यकाळात वाढला आहे याकडे महायुतीच्या नेत्यांनी लक्ष वेधले असून महाविकास आघाडीच्या नेत्यांना या मुद्यावरून खोटा प्रचार करण्यापासून रोखले आहे. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्राचा जीडीपी १३ टक्क्यांपर्यंत खाली घसरला होता. तो आता महायुती सरकारच्या कार्यकाळात १३.३ टक्के इतका झाला आहे. महाविकास आघाडीचा कार्यकाळ म्हणजे राज्यातील जनतेने युती सरकारला दिलेला जनादेश धुडकावून उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदासाठी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर संगनमत करून जनतेवर लादलेले सरकार. या सरकारच्या कार्यकाळात ठाकरे यांनी नाणारच्या प्रकल्पाबाबत कोलांटी उड्या मारल्या. बेगडी पर्यावरणप्रेमापोटी आरे येथील मेट्रोच्या कारशेडलादेखील विरोध केला. तेथील कारशेडला स्थगिती देऊन ती अन्यत्र उभारण्याचा खेळ सुरू केला. या साऱ्यातून निव्वळ या प्रकल्पाचा खर्च तेवढा दहा हजार कोटींनी वाढला. नीट तपशीलात जाऊन पाहिले तर महाविकास आघाडीच्या या कार्यकाळात राज्यात उद्योगधंदे आले नाहीत हे स्पष्ट दिसते. याबाबतीतही त्यांनी कोविड महामारीकडे बोट दाखवून स्वत:चा बचाव केला, परंतु प्रत्यक्षात या कालखंडात राज्यातील प्रकल्प अन्यत्र गेल्यामुळे तसेच पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक घटल्याने रोजगारांचे प्रमाणही घटले. एकूणच या काळात राज्यातील विविध क्षेत्रांवर व महाराष्ट्राच्या आर्थिक आरोग्यावर वाईट परिणाम झाला, परंतु महायुती सरकारने सत्तेवर आल्यापासून गेल्या दोन वर्षांत अनेक ठोस योजना राबवल्या. स्वाभाविकपणे त्याचे सकारात्मक परिणामही राज्यात जाणवू लागले. महायुती सरकारने २०२४ साली अनेक सामंजस्य करार केले. आपल्या एकंदर कामगिरीचे विरोधकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारे रिपार्ट कार्ड महायुतीने सादर केले आहेच, परंतु मिळेल त्या गोष्टीचा आधार घेऊन अपप्रचार करण्याचा प्रयत्न मविआच्या नेत्यांनी चालवला आहे. 'लाडकी बहीण योजने'च्या संदर्भातही त्यांनी असेच गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न चालवला आहे, परंतु दिशाभूल करण्याचे राजकारण करताना त्यातून किमान आपल्या महाराष्ट्राची अकारण बदनामी होणार नाही याची काळजी तरी विरोधकांनी घ्यायला हवी आहे.**

# पनवेलमध्ये 'मविआ'तील बिघाडी महायुतीसाठी पोषक

### खबरबात
नितीन देशमुख

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये १८८ पनवेल विधानसभा मतदार संघात १३ उमेदवार असले तरी खरी लढत भाजपचे प्रशांत ठाकूर, महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या उबाठाच्या लिना गरड व शेकापचे बाळाराम पाटील यांच्यात होणार असल्याचे सोमवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी स्पष्ट झाले. त्यामुळे महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचा विजय ही आता एक औपचारिकताच राहिली असल्याचे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

उत्तर रायगड जिल्ह्यात शेकापची अवस्था केविलवाणी झालेली पाहायला मिळत आहे. पनवेल विधानसभा उमेदवारीसाठी माजी विधानपरिषद सदस्य बाळाराम पाटील यांनी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी भल्या सकाळी उध्दव ठाकरेंचे पाय धरून उबाठा सेनेचा एबी फॉर्म मिळवला. बाळाराम पाटील आपल्या कार्यकर्त्यांना आपण उबाठा सेनेचा एबी फॉर्म का घेतला याचे स्पष्टीकरण देत होते. त्याच वेळी एबी फॉर्म पनवेलच्या वेशीवर पोहचण्यापूर्वीच काढून घेण्यात आल्याची बातमी आली. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशाने आपला अर्ज मागे घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर नाकाला रुमाल धरून बसलेल्या लिना गरड यांचा चेहरा उजळलेला पाहिला मिळाला.

बाळाराम पाटील यांनी संध्याकाळी पत्रकार परिषद घेऊन अजून ही आपल्यालाच उबाठा सेनेचा पाठिंबा मिळेल, अशी वल्गना करीत होते. आपला पराभव स्पष्ट दिसत असल्याचे त्यांची बॉडी लँग्वेज सांगत होती. कर्नाळा बँक बुडल्याने हजारो कुटुंबांना देशोधडीला लावणाऱ्या शेकापला येथील जनता माफ करणार नाही हे सांगण्यासाठी कोणा ज्योतिषाची गरज नाही. आजपर्यंत शेकापचा इतिहास पाहिला तर कोणतेही उद्योग किंवा नोकऱ्या उपलब्ध होतील, अशा सुधारणांना विरोध केला. त्यामुळे तरुणांना नोकर्या मिळाल्या नाहीत. त्यांना आपसात झुंजवून जेलच्या वाऱ्या करायला लावल्या नेते मात्र कमिशन खाऊन गब्बर झाले. आजच्या तरुण पिढीच्या हे लक्षात आल्याने ती शेकापपासून लांब गेलेली पाहायला मिळते.

लिना गरड या उबाठाच्या अधिकृत उमेदवार असल्या तरी त्यांची ओळख खारघर फोरमच्या नेत्या म्हणून आहे. स्थानिक सेनेच्या नेत्यांचा त्यांना विरोधच आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते त्यांना फारशी मदत करणार नाहीत. आपल्या पक्षाचे नेते आले की, फोटोत दिसायला त्यांचे सोबत येतील. त्यामुळे काही हजार मतांच्या पुढे त्या जाणे शक्य नाही. अशा वेळी श्रीमंत असूनही जमिनीवर पाय असलेले नेतृत्व म्हणजे आमदार प्रशांत ठाकूर असेच म्हणावे लागेल. वडीलोपार्जित श्रीमंती असून ही सत्ता आणि पैसा याची नशा प्रशांतजींच्या डोक्यात गेलेली नाही. आपले वडील माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचा राजकीय वारसा घेऊन आलेले राजकारणातील नेतृत्व असल्याने सामान्या कार्यकर्ते आमदार म्हणजे आपला घरचा समजून त्यांच्याकडे कामे घेऊन जातात. प्रशांतजी त्यांना शक्य असलेली मदत करतात असा अनुभव अनेकांना आलेला आहे.

पनवेलमधील राष्ट्रीय स्वयंसेवक सेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक नंदकुमार ओझे. ज्यांच्याकडे रायगड आणि ठाणे जिल्ह्याची जवाबदारी संघाने अनेक वर्षे दिली होती. त्यांनी रायगड आणि ठाणेमध्ये भारतीय मजदूर संघटनेचे काम केले होते. त्यांनी आपल्या वयाच्या ७८व्या वर्षी मुलाखत देताना संगितले होते की, मी माझ्या आयुष्यात स्वप्नात ही पाहिले नव्हते असे यश पनवेल तालुक्यात भाजपला मिळाले आहे. आज पनवेलमध्ये भाजपशिवाय कोणी ही शिल्लक नाही अशी परिस्थिती मी पाहत आहे. निवडणूका मी आबासाहेब पन्हाळकरांपासून पाहत आहे. त्यांचा पराभव दि.बा. पाटीलांनी केला होता. आम्हाला शेकापवाले नेहमी सांगायचे आमच्या जेवढ्या बैलगाड्या पनवेलमध्ये येतील त्यापेक्षा तुम्हाला एक मत मत कमी पडेल. आमच्यासाठी पनवेल एवढा खडकाळ तालुका होता.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी एवढे काम केले आहे की आज त्यांना विरोध करणे शक्य नाही. त्यांच्यासमोर उभा करायला विरोधकांकडे कोणी उमेदवारच नाही. आमदार प्रशांत ठाकूर यांचे वैयक्तिक चारित्र, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे व्यक्तिमत्व अमित शहा आणि मोदींची भाजपवर असलेली कमांड आणि देवेंद्र फडणवीस यांचे कणकर नेतृत्व आणि प्रशांतजींसारखे कार्य यामुळे आज भाजपला पनवेलमध्ये पर्याय उरलेला नाही. वयाने लहान असून ही प्रशांताजींना एवढे मोठे यश मिळाले ते त्यांची समाजासाठी काही तरी करून दाखवण्याची वृत्ती आणि त्यांच्या दूरदृष्टी यामुळेच शक्य झाले आहे.

पनवेलमध्ये असलेल्या आयटीआयचा वापर करून येथील तरुणाला येथेच रोजगार उपलब्ध करून देण्याचे आमदार म्हणून त्यांचे व्हीजन होते. तरुणांच्या व्यवसाय वृध्दीसाठी त्यांनी जाणीव पूर्वक प्रयत्न केले आहेत. त्यामुळे ते तरुण त्यांचे कार्यकर्ते बनले आहेत. पनवेलमध्ये महापालिका स्थापन करण्यापासून येथील रस्ते आणि मूलभूत सुधारणा करताना त्यांनी भविष्यात पनवेल शहराची होणारी वाढ कशी असेल याचा विचार आपल्याला पाहायला मिळत आहे. त्यांना येथील जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांना सिडकोचे अध्यक्षपद मिळाले होते असेच म्हणावे लागेल. त्याचा फायदा त्यांनी विस्थापिताना नक्कीच करून दिला अनेक प्रश्न मार्गी लागले. महापालिकेत सिडकोहद्दीतील प्रभाग हस्तांतर करताना येणाऱ्या अडचणी दूर करणे शक्य झाले.

गरजेपोटी विस्तार केलेल्या घरांचा प्रश्न यासारखे प्रश्न मार्गी लागल्याचे पाहायला मिळतात. आज आमदार प्रशांत ठाकूर यांनी एवढे काम केले आहे की आज त्यांना विरोध करणे शक्य नाही त्यामुळे या वेळी त्यांचा विजय लाखापेक्षा जास्त मतांनी होईल यामध्ये शंका नाही.

# चित्रपट, कथाकार दिनकर पाटील

दिनकर दत्ताजी पाटील यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९१५ रोजी चिकोडी तालुक्यातल्या बेनाडी या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्याच गावात झाले. मात्र आध्यात्मिक शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आपल्या मामाकडे आले आणि त्यांनी विद्यापीठ हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. मा. विनायक हे दिनकर पाटील यांच्या वर्गाला मराठी शिकवत. त्या काळात गजानन जागीरदारही या शाळेत शिक्षक म्हणून काम करत. त्या काळात वि.स. खांडेकर आणि ना.सी. फडके हे विद्यार्थ्यांचे आवडते लेखक होते. विद्यापीठ हायस्कूलमधील साहित्यप्रेमी विद्यार्थी दर रविवारी मा. विनायक यांच्याकडे जमत. मा. विनायक 'किर्लोस्कर'मध्ये छापून आलेल्या फडके आणि खांडेकर यांच्या कथा त्यांना वाचून दाखवत. अशा प्रकारे दिनकर पाटील यांच्यामधील साहित्यिक घडण्यास सुरुवात झाली.

उच्च शिक्षणासाठी दिनकर पाटील यांनी राजाराम महाविद्यालयात प्रवेश घेतला. महाविद्यालयाच्या 'राजारामीयन' मासिकाचे संपादक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. ना.सी. फडके यांच्याबरोबर कवी माधव ज्युलियनही या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करत होते. या मोठ्या साहित्यिकांच्या प्रभावाने



दिनकर पाटील यांनी लिहिण्यास सुरुवात केली. 'सेवक', 'सत्यवादी' या वृत्तपत्रातून लेखन करण्यास त्यांनी सुरुवात केली. लवकरच 'किर्लोस्कर' मासिकाच्या कथास्पर्धेत दिनकर पाटील यांच्या 'एरीना' या कथेला प्रथम पारितोषिक मिळाले आणि लेखक म्हणून त्यांना मान्यता मिळाली.

दिनकर द. पाटील हे मान्यताप्राप्त पटकथाकार झाले. वि.स. खांडेकर, ना.सी. फडके यांसारखे लेखक जरी त्यांचे आवडते असले, तरी चित्रपटाचे संवाद लिहिताना त्यांना भालजी पेंढारकरांची शैली जवळची वाटली. 'माझं शिष्यत्व सांगणारे कोणी असोत किंवा नसोत, पण माझा खरा शिष्य कोणी शोभत असेल तर दिनकर पाटीलच.' असे भालजी पेंढारकरांनी म्हटले होते. पण दिग्दर्शनाच्या बाबतीत मात्र दिनकरराव हे 'विनायकरावांच्या' परंपरेतील विद्यार्थी होते.

दिनकर पाटील जवळपास पन्नास वर्ष चित्रपट क्षेत्रात कार्यरत होते. त्या काळात सुमारे १००हून जास्त चित्रपटांचे लेखन, ३५ चित्रपटांचे दिग्दर्शन त्यांनी केले. १० अनुबोधपट तयार केले. या व्यतिरिक्त ५ नाटके, २ एकांकिका, ४ कथासंग्रह, ४ व्यक्तिचित्र संग्रह, आणि 'रुपेरी पडदा तंत्रमंत्र' अशी मोठी मजल त्यांनी मारली. 'पाटलाचं पोरं' हे आत्मचरित्रही त्यांनी लिहिले. १९५३ साली त्यांनी दिनकर चित्र संस्थेची स्थापना केली. दिनकर पाटील यांनी मराठी चित्रपट क्षेत्रात 'ग्रामीण चित्रपटांची' मोलाची भर घातली.

**-स्नेहा अवसरीकर**

## बदलते तंत्रज्ञान

# आता कमी प्रकाशातही करता येणार व्हिडीओ कॉल

व्हॉट्सअ‍ॅप हे जगभरात सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग अ‍ॅप आहे. व्हॉट्सअ‍ॅप नेहमी वापरकर्त्यांना नवीन




फीचर देत असतं. काही दिवसांपूर्वी व्हॉट्सअ‍ॅपवर व्हिडीओ कॉलिंगसाठी एक नवीन फीचर आले आहे. हा लो-लाइट मोड व्हॉट्सअ‍ॅपवर अधिक चांगला व्हिडीओ कॉलिंग अनुभव देईल. हे फीचर कमी लाईटमध्येही व्हिडीओ कॉलिंगमध्ये येणाऱ्या समस्या कमी करेल.

यासोबतच व्हॉट्सअ‍ॅपवर व्हिडीओ कॉलिंगसाठी नवीन फिल्टर्स आणि बॅकग्राउंड ऑप्शनचाही समावेश करण्यात आला आहे. वापरकर्त्यांना कमी-प्रकाश परिस्थितीत व्हिडीओ कॉलिंगच्या वेळी स्पष्ट दिसण्यासाठी मदत देते. एकूणच, व्हॉट्सअ‍ॅपचे हे फीचर अंधुक प्रकाशात चांगल्या स्पष्टतेसह व्हिडीओ कॉलिंग देते.

Meta च्या मेसेजिंग अ‍ॅप व्हॉट्सअ‍ॅपवर व्हिडीओ कॉलची स्पष्टता सुधारण्यासाठी लो-लाइट मोड फीचर देण्यात आले आहे. हे फीचर व्हॉट्सपमध्ये काही दिवसापूर्वीच दिले आहे. यामध्ये फिल्टर जोडले आहेत. कमी प्रकाशात वापरकर्त्यांना चांगला व्हिडीओ गुणवत्ता देण्यासाठी कंपनीने लो-लाइट मोड डिझाइन केले आहे, हे व्हिडिओमधील चमक तसेच ग्रेनेस कमी करण्यास मदत करते.

या फीचरच्या मदतीने, वापरकर्ते कमी प्रकाश असलेल्या भागातही अधिक स्पष्टतेसह त्यांचे मित्र आणि कुटुंबासह व्हिडीओ कॉल करण्यास सक्षम असतील. व्हॉट्सअ‍ॅपचा लो-लाइट मोड सुरू करणे अगदी सोपे आहे, हे कमी प्रकाशात चांगल्या व्हिडीओ कॉलिंगसाठी आणले आहे. हे फीचर सुरू करण्यासाठी, वापरकर्त्यांना फक्त टॉगल प्रेस करावे लागेल. पहिल्यांदा तुम्हाला तुमच्या फोनमध्ये व्हॉट्सअ‍ॅप ओपन करावे लागेल. यानंतर तुम्हाला तुमच्या फोनवरून व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉल करावा लागेल. आता तुम्हाला तुमच्या व्हिडीओ फीडवर क्लिक करावे लागेल आणि ते पूर्ण स्क्रीनवर उघडावे लागेल. तुम्ही वरील बल्ब आयकॉनवर क्लिक करून लो-लाइट मोड सुरू करु शकता.

तुम्ही हा बल्ब त्याच्या आयकॉनवर क्लिक करून अक्षम देखील करू शकता. व्हॉट्सपचे हे फीचर अँड्रॉईड आणि आयओएस या दोन्ही युजर्ससाठी आणण्यात आले आहे. फीचर आता डेस्कटॉप व्हर्जनसाठी उपलब्ध नाही. यासोबतच यूजर्सला प्रत्येक कॉलसाठी हे फीचर सुरू करावे लागेल.

# विविधांगी भूमिका साकारणारे अभिनेते संजीवकुमार

संजीव कुमार यांना बॉलिवूड हरी भाई म्हणायचे. त्यांचे खरे नाव हरिहर जेठालाल जरीवाला होते. जरी आज संजीव कुमार जगात नाहीत तरीदेखील त्यांच्या अभिनयाची छाप आजही त्यांच्या चाहत्यांच्या मनात तशीच आहे. संजीव यांना अभिनयाचा छंद जडला. ते इतरांशी जोडले गेले आणि रंगमंचावर काम करू लागले. तेव्हा त्यांनी भारतीय राष्ट्रीय रंगमंचाच्या माध्यमातून बऱ्याच नाटकात कामे केलीत. अशा प्रकारे त्यांनी आपल्या जीवनाची सुरुवात केली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्या विषयी माहिती.

संजीव कुमार यांचा जन्म ९ जुलै १९३८ साली झाला. त्यांचे जन्म नाव हरिहर जरीवाला होते, परंतु प्रेमाने सर्व नातेवाईक आणि नातेवाईकांनी त्यांना हरिभाई जरीवाला म्हणून ओळखत. त्यांचे वडिलोपार्जित घर सूरत असले तरी चित्रपटसृष्टीच्या इच्छेने त्यांना मुंबईत आणले.

संजीव कुमारने लग्न केले नाही परंतु अनेक वेळा प्रेम केले. त्यांना एक अंधश्रद्धा होती की, त्यांच्या कुटुंबात मोठा मुलगा १० वर्षांचा झाल्यावर वडिलांचा मृत्यू होतो. हे त्याचे आजोबा, वडील आणि भाऊ सर्वजणांसोबत घडले होते. संजीव कुमारने आपल्या दिवंगत भावाच्या मुलाचा दत्तक घेतला आणि दहा वर्षांचा



### निमित्त

असताना मरण पावला.

संजीव कुमार यांचा 'हम हिंदुस्तानी' हा पहिला चित्रपट होता. यानंतर त्यांनी बऱ्याच चित्रपटातून छोट्या-मोठ्या भूमिका केल्या आणि हळूहळू आपली ओळख निर्माण केली. यानंतर १९६८ मध्ये प्रदर्शित झालेला 'राजा और रंक' चित्रपटाच्या यशानंतर संजीव इंडस्ट्रीमध्ये खऱ्या अर्थाने उभे राहिले. 'संघर्ष' मध्ये त्यांनी दिलीपकुमार यांच्यासोबत छोटीशी भूमिका साकारली होती. त्या छोट्याशा भूमिकेतूनही त्यांनी आपल्या अभिनयाची एक वेगळीच छाप सोडली. दिलीप साहेबदेखील तेव्हा त्यांच्या अभिनयाने खूप प्रभावित झाले होते. संजीव कुमार आणि शत्रुघ्न सिन्हा यांची घट्ट मैत्री होती. 'खिलौना' चित्रपटात संजीव यांच्या सांगण्यावरूनच शत्रुघ्न यांना खलनायकाची भूमिका मिळाली होती.

संजीव कुमार यांनी आपल्या करिअमध्ये अनेक प्रयोग केले. जेव्हा जेव्हा त्यांना संधी मिळाली तेव्हा त्यांनी केवळ नायक म्हणून काम न करता प्रौढ व्यक्तीच्या भूमिकाही साकारल्या. रंगमंचावर काम करत असताना संजीव कुमार यांनी वयाच्या २२ व्या वर्षीच ६० वर्षांच्या व्यक्तीची भूमिका साकारली होती.

संजीव कुमार यांना १४ फिल्मफेअर पुरस्कारांसाठी नामांकन देण्यात आले होते, तीनदा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेते म्हणून तर उर्वरित सर्वोत्कृष्ट अभिनेता. त्यांनी दोनदा सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून आणि एकदा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून पुरस्कार जिंकले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार जिंकला. सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार जिंकला. संजीव कुमार यांच्या स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट अभिनेता, दिग्दर्शक आणि बॅकस्टेज तंत्रज्ञ यांना दरवर्षी पुरस्कार आणि रोख बक्षिसे दिली.

संजीव कुमार यांनी ६ नोव्हेंबर १९८५ रोजी अखेरचा श्वास घेतला. संजीव कुमार यांच्या निधनानंतर त्यांचे दहापेक्षा जास्त चित्रपट प्रदर्शित झाले. बऱ्याच चित्रपटांची शूटिंग बाकी होती. कथा बदलून हे प्रदर्शित केले गेले. संजीव कुमार यांचा 'प्रोफेसर की पडोसन' हा शेवटचा चित्रपट १९९३ मध्ये प्रदर्शित झाला होता.

**(साभार : मराठी मोल)**

### क्लिक...क्लिक...!



**मुरुड : दिवाळीनिमित्त सलग सुट्ट्यांमुळे समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलले आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# बारीक होण्यासाठी 'या' तीन गोष्टी नक्की करा!

लठ्ठपणाची समस्या सध्या वाढत चालली आहे. बैठी काम करण्याची शैली तसेच बिघडलेले दैनंदिन जीवनाचे वेळापत्रक यामुळे भारतीय लोक लठ्ठपणाचे बळी होत चालले आहेत. लठ्ठपणामुळे शरीरात अनेक समस्या निर्माण होते. वाढत्या वजनाने अनेक दुखणी मागे लागतात. त्यामुळे काही



सोपे उपाय जर अमलात आणले तर आपल्या शरीराची चरबी वितळण्यास मदत मिळू शकते. लठ्ठपणा आणि आपल्या आहार विहाराचा जवळचा संबंध आहे. जर आपण याविषयीचे नियम पाळले तर नक्की लठ्ठपणापासून वाचू शकतो.

**सकस आणि भरपूर नाश्ता करावा** - जर तुम्हाला आपले वजन कमी करायचे असेल तर ब्रेकफास्ट मध्ये पोषक तत्वांनी भरपूर असलेल्या अन्नपदार्थांचा वापर केला पाहीजे. ब्रेकफास्ट करण्याचे कधी टाळू नये. यात आपण प्रोटीन, फायबर, ज्यूस, फळे, ओट्स आदीचा वापर करु शकता. प्रोटीनने भरपूर असलेला आहार घ्यावा. जंक फूड, मैदा, साखर, आणि तळलेले पदार्थ खाण्यापासून दूर रहावे. फळ आणि भाज्यांचा आहारात समावेश करावा. यात फायबर आणि पोषक तत्वाचं प्रमाण जास्त असते. कोबीच्या भाजीचा आहारात समावेश करावा, यातील टॅरटेरिक एसिड,शरीरातील कार्बोहायड्रेटचे चरबीत रुपांतर करीत नाही. जेवण करताना प्रत्येक घास नीट चावून चावून खावा.

**सकाळी लवकर उठवण्याची सवय करा** - जर तुम्हाला आपले वजन कमी करायचे असेल सकाळी लवकर उठण्याचा प्रयत्न करावा, आयुर्वेदानुसार रात्री लवकर झोपून सकाळी लवकर उठायला हवे. त्यामुळे अनेक आजारातून सुटका मिळते. सकाळी लवकर उठल्याने आपले शरीर सक्रीय राहाते आणि शरीर नीट कार्य करू लागते. त्यामुळे सक्रीय झालेल्या शरीरात चरबीदेखील वेगाने वितळत असते.

**रिकाम्या पोटी कोमट पाणी प्यावे** - सकाळी उठल्यानंतर आपण कोमट पाणी उपाशीपोटी प्यायला हवे, त्यामुळे मेटबॉलिज्म वेगाने होते. आपले शरीराचे डिटॉक्सिफाय लवकर वेगाने होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. तुम्ही कोमट पाण्यात लिंबू रस टाकून प्यायल्यास ही फायदा होतो. जर यात मध, आल्याचा रस आणि एप्पल सायडर विनेगर मिळूनदेखील पिता येऊ शकते.

# सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

## रिक्षासह एक लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांकडून पनवेल परिसरातून पकडण्यात आले आहे. त्याच्याकडून पोलिसांनी एक लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



पेण पोलीस ठाणे हद्दीत नूतन बाळकृष्ण पाटील यांच्या चोरी झाल्याची तक्रार त्यांनी दाखल केली होती. फिर्यादी नूतन पाटील यांची आई, वडील व भाऊ हे बाहेर गेल्याने घराला लॉक लावून फिर्यादी या बाजूला काकांच्या घरी त्या दिवशी गेल्या होत्या. त्या दरम्यान आरोपीने त्यांचे घराचे दरवाजाचा लॉक हत्याराने तोडून आतील रूममधील लोखंडी कपाटातील सोन्याचा हार, सोन्याचे झुमके, सोन्याच्या रिंगा व सोन्याची डवली असे ६३ हजार रूपये किमतीचे सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला होता. चोरी झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादी नूतन पाटील यांनी तक्रार दाखल केली होती. यानंतर पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांचे आदेशाने गुन्ह्याचा तपास हवालदार अजिंक्य अनंत म्हात्रे यांचेकडे देण्यात आला.

परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनिय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी अनिल लक्ष्मण नाईक (वय ४१, रा. गिरवले, सोमटणे, पनवेल) यास अटक करण्यात आली आहे. आरोपीने तपासादरम्यान गुन्हा कबुल केला असून त्याच्याकडून सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण एक लाख तीन हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरोधात यापूर्वीही गुन्हे दाखल झालेले आहेत.

# माणगावात महायुतीच्या प्रचारार्थ गाव बैठका

**माणगाव** : विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सर्वत्र सुरू असून श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील माणगाव नगरपंचायत हद्दीत बुधवारी (दि.६) महायुतीच्या उमेदवार ना. आदिती वरदा सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ गावबैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

मंत्री आदिती तटकरे या वॉर्ड क्र.४मधील श्री वाकडाई मंदिर येथे प्रचार शुभारंभ सायंकाळी ५ वा., उतेखोल गाव येथील समाजमंदिर सायंकाळी ५:३० वा.,दत्तनगर वॉर्ड क्र.२ शरद शिगवण निवास सायंकाळी ६:३० वा., नाणोरे गाव साईबाबा मंदिर सायंकाळी ७:३० वा.,भादाव गाव रात्री ८:३० वा, जुने माणगांव रात्री ९ वा. ग्रामस्थांशी संवाद साधणार आहेत.

# श्रीवर्धन आणि महाडमध्ये मतदानयंत्रांची दुसरी सरमिसळ



**रायगड : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन व महाड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सामान्य निवडणूक निरीक्षक सतिश कुमार एस. यांच्या उपस्थितीत मतदानयंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया मंगळवारी (दि.५) करण्यात आली.

या वेळी १९४-महाड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे, १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक सतिश कुमार एस. (सामान्य) यांनी उपस्थितांना श्रीवर्धन व महाड विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि निःपक्षपातीपणे काम करावे अशा सूचना दिल्या.

१९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघामध्ये ३५१ मतदान केंद्र असून याकरिता ४२१ बॅलेट युनिट, ४२१ कंट्रोल युनिट तर ४५६ व्हीव्हीपॅटचे वाटप करण्यात आले आहे.

१९४-महाड विधानसभा मतदारसंघामध्ये ३९३ मतदान केंद्र असून याकरिता ४७१ बॅलेट युनिट, ४७१ कंट्रोल युनिट तर ५१० व्हीव्हीपॅटचे वाटप करण्यात आले आहे.

# ना.म. जोशी विद्याभवनतर्फे पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती



**माणगाव : प्रतिनिधी**

स्विप मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील ना.म. जोशी विद्याभवन गोरेगाव यांच्यातर्फे पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करण्यात आली.

रायगडात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक घेण्यात येणार आहे. यासाठी शासनातर्फे विविध उपक्रम राबवून नागरिकांना मतदान करण्याचे महत्त्व पटवून दिले जात आहे. गोरेगाव ना.म. जोशी विद्याभवन शाळेत मतदान जनजागृतीकरीता रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी सहभाग घेतला.

# कोटेश्वरी देवीचा आशीर्वाद घेऊन शिवसेनेचा प्रचार सुरू

**मुरूड : प्रतिनिधी**

महायुतीतील शिवसेनेच्या प्रचाराचा शुभारंभ ग्रामदेवता कोटेश्वरी देवी मातेच्या चरणी श्रीफळ अर्पण करून मुरूड शहरापासून करण्यात आला.

शिवसेनेचे मुरूड शहरप्रमुख संदीप पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराची सुरुवात करण्यात आली. या वेळी शिवसेना, भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार महेंद्र दळवी यांचा विजय असो, अशा घोषणा देत प्रचाररॅली मंगळवारी (दि.५) शहरातील बाजारपेठ, मारुती नाका आदी भागात फिरवण्यात आली. या वेळी प्रचारपत्रक व आमदार महेंद्र दळवी यांची निशाणी याचा प्रचार अगदी सर्व घटकांपर्यंत करण्यात आला.

प्रचार रॅलीत माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते मनोज भगत, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, सुपारी संघाचे चेअरमन बाबा दांडेकर, माजी चेअरमन महेश भगत, जिल्हा संघटिका तृप्ती पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, भाजपचे मुरूड तालुकाध्यक्ष शैलेश काते, भाजप मुरूड शहराध्यक्ष महेश मानकर, उमेश माळी, पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, माजी नगरसेवक पांडुरंग आरेकर, माजी बांधकाम सभापती मेघाली पाटील, शिवसेनेचे युवक अध्यक्ष ओम पाटील, सचिव विजय पैर, प्रकाश सरपाटील आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.





वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर


**''नोटीस''**

**विषय:- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

संदर्भ :- अर्जदार श्री. गणेश नामदेव भोईर, रा. भिंगार, पो. अजिवली, ता.पनवेल, जि. रायगड यांचा दि. ०८/०५/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. गणेश नामदेव भोईर, रा. भिंगार, पो. अजिवली, ता.पनवेल, जि. रायगड यांनी कै. निर्मला नामदेव भोईर यांची उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक २०/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०५/११/२०२४

**सही/-**
**(संभाजी शेलार)**
निवासी नायब तहसलिदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी अपर
तहसिलदार कार्यालय पनवेल


# कुणबी युवा मुंबईच्या वतीने अनंत थिटे यांचा सन्मान

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जनमोर्चा रोहा तालुकाध्यक्ष अनंत थिटे यांना मुंबई येथे कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न कुणबी युवा मुंबई यांच्या वतीने परिवर्तनाचे शिलेदार या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



अनंत थिटे यांनी रोहा तालुक्यासह रायगड जिल्ह्यात ओबीसी जनमोर्चा व कुणबी समाजांतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांनी कुणबी समाज युवक अध्यक्ष म्हणूनसुद्धा काम केले आहे. ते सध्या ओबीसी जनमोर्चा रोहा तालुकाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.

अनंत थिटे यांना पुरस्कार मिळाल्यानंतर ओबीसी जनमोर्चा कार्याध्यक्ष चंद्रकांत बावकर कुणबी समाजोन्नती संघ अध्यक्ष अनिल नवगणे, ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश मगर, कुणबी समाजोन्नती संघ सरचिटणीस कृष्णा वने, खजिनदार महेश शिर्के, कुणबी समाज नेते रामचंद्र सकपाळ, शिवराम शिंदे, शंकर भगत, अविनाश लाड, रोहिदास दुषार राजेश बेंडल, कृष्णा कोबनाक, नवनीत डोलकर, उत्तम नाईक शशिकांत कडू, विकास खांडेकर, संतोष भोईर, डॉ. मंगेश सानप, भास्कर पवार, शरद गंभे, सुनील ठाकूर, हरेश पवार, विलास गोलाटे, पांडुरंग दांडेकर आदींनी अभिनंदन केले.

# बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर प्रकाश गोंजी सेवानिवृत्त

**मुरूड : प्रतिनिधी**

बँक ऑफ इंडिया बँकेत ४० वर्षे सेवा करून मॅनेजर प्रकाश गोंजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या कार्याचा सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



या वेळी नवीन बँक मॅनेजर अमोल जाधव, कामेश्वर शर्मा, रवी गुप्ता, राम कर्मचारी, कृष्णा चोगले, रामचंद्र आरेकर, उत्तम पाटील, रशीद हद्दादी, तुकाराम जाधव, प्रकाश उमरोटकर, ताराचंद जैन, रमेश गोंजी, किसन गोंजी, प्रल्हाद गोंजी, बाळकृष्ण गोंजी आदी उपस्थित होते. प्रकाश गोंजी हे मूळचे मुरूडचे असल्याने परिसरातील ग्राहकांना अतिशय उत्तम सेवा दिली. उपस्थित मान्यवरांसह नागरिकांनीही त्यांच्या कामाचा गौरव केला. त्यानंतर त्यांना भेटवस्तू देऊन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे कि, मौजे नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्ड मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार चैतन्य चतुर्वेदी व रीना चैतन्य चतुर्वेदी यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत**

| अनु क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ (हे आर-प्र.) | आकार (रु.-पै.) |
|---|---|---|---|
| १ | ८/१ (पै) (खाते क्र. १०६) | १-६०-० | ०३-३५ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचे कोणत्याही प्रकारचे तारण, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर कोणत्याही प्रकारचे इजमेन्ट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, भाडेकरू पणाचा हक्क, साठेकरार कुळमुखत्यारपत्राने करार, मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी इतर वारसांनी वा संबंधितानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, आक्षेप, तक्रार दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा. हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती, आक्षेप, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

मार्फतः
अ‍ॅड. दीपा बिष्ट,
द्वारा तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४०,
ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेल समोर,
केम्प्स कॉर्नर, मुंबई - ४०००२६.
ई-मेल: adv.deepabisht@gmail.com

दिनांक : ०६/११/२०२४
ठिकाण: पनवेल


# माणगावच्या सई तळकरची कमाल!

✻ १८ मिनिटे ९ सेकंदात घेतल्या ५२१ गिरक्या

✻ इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये पराक्रमाची नोंद

**माणगाव : प्रतिनिधी**

शहरातील भादाव गावातील सई सतीश तळकर या ७ वर्षांच्या लहानग्या मुलीने स्वत:भोवती गिरकी घेत अँटीक्लॉकवाईज फिरवण्याचा प्रकार करून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरले आहे. तिने अवघ्या १८ मिनिटे ९ सेकंदात हुलाहुप करीत गिरक्या घेतल्या.



तिचे महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्यासह उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी उपनगराध्यक्ष राजेश मेहता, ज्येष्ठ पत्रकार अरुण पवार यांनी विशेष कौतुक करीत तिला शुभेच्छा दिल्या.

सई तळकर ही भादाव या छोट्याशा खेड्यात राहत असून ती राजिप शाळेत इयत्ता दुसरीत शिक्षण घेत आहे. तिचा लहान भाऊ स्वस्तिक याने भाऊबीज म्हणून हुलाहुप करण्यासाठी एक गोल रबरी रिंग आणून दिली. त्यावर ती घरी नित्यनियमाने सराव करीत होती. त्यानंतर तिने शाळेत १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी रोजी आपली कला सादर केली. ती अतिशय वेगाने कमरेभोवती स्वतः भोवती फिरून गोल रिंगही गोल फिरकी घेत असल्याचे आई-वडिलांच्या लक्षात आले. त्यानंतर तिच्या आईने मोबाईलवरून हा नृत्यप्रकार शोधून इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड यांच्याशी संपर्क साधला. तिच्या या गिरकी नृत्याचा व्हिडीओ वेळ निश्चित करून पाठवला. त्यानंतर संस्थेने खातरजमा करून तीन महिन्यांनी सईने हुलाहुपमध्ये सर्वोत्तम कामगिरी करून राष्ट्रीय विक्रम नोंदविला आहे, असे कळविण्यात आले. त्यांनी सन्मानित केलेल्या सन्मानपत्रात सई घड्याळाच्या काट्याप्रमाणे वेगाने फिरते आहे, अशा शब्दांत गौरव केला आहे.

सईला पुरस्कारांमध्ये सुवर्ण पदक, सन्मानपत्र आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड २०२४च्या भारतीय विक्रमांचे भलेमोठे पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले आहे. मंत्री आदिती तटकरे यांनी सईचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी मदत केली जाईल, असे आश्वासन दिले.

# मतदानाच्या दिवशी आठवडा बाजार पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये बुधवारी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. सर्वांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरणार आहे, अशा सर्व ठिकाणी बाजार व जत्रा पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड किशन जावळे जारी केला आहे.

अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग)मधील तरतुदीनुसार या विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, मतदाराला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, मतदान सुरळीतपणे पार पडणे याकरिता २० नोव्हेंबर रोजी मतदानाच्या दिवशी रायगड जिल्ह्यातील ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरणार आहे, अशा सर्व ठिकाणी बाजार व जत्रा पूर्णवेळ बंद राहणार आहेत.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड,
बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र.कुबनप/आरोग्य/१६०/२०२४-२५ दिनांक :- ५/११/२०२४

**जाहीर सुचना**

या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, कुळगाव बदलापूर नगरपरिषदे मधील सेप्टिक टँक मैला टँकरद्वारे नगरपरिषद हद्दितील तसेच नगरपरिषद हद्दिबाहेरील सेप्टिक टँकची सफाई करण्यात येते. त्यासंबंधित शुल्काबाबतची माहीती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सेवेचे ठिकाण | प्रति फेरा आकारण्यात येणारे शुल्क | नगरपरिषद ते पुरविण्यात येणाऱ्या सेवेच्या ठिकाणा पर्यंत प्रति किमीचे दर |
|---|---|---|---|
| १. | नगरपरिषद हद्दिमध्ये | रू.६५०/- | - |
| २. | नगरपरिषद हद्दिबाहेर | रू.१३००/- | प्रति किमी रू.२०/- |

**सही/**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
**कुळगांव**



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-कर्नाळा, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे : कर्नाळा, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर. पॉ | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कर्नाळा | श्री. आसीफ अयुब दाखवे व इतर | १३ | ०.७८.०० ०.०५.०० ०.८३.०० | १.६९ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५** दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०५/११/२०२४

**सही/-**
**अ‍ॅड. सुरेखा र. सागावकर**

पत्ता- शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी,
प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर-५, नवीन पनवेल, ४१०२०६

# गुन्हेगारीसह अपघातांचे प्रमाण वाढले

## लक्ष्मीपूजनानंतर दागिने, पैशांवर डल्ला

**नवी मुंबई : बातमीदार**

लक्ष्मीपूजनानंतर मांडलेला ऐवज चोरी झाल्याची घटना घणसोलीत घडली. घराचा दरवाजा उघडा ठेवला असता चोराने डल्ला मारला. या प्रकरणी रबाळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यामुळे घणसोली विभागात खळबळ उडाली आहे.

घणसोलीत राहणाऱ्या सोमनाथ गोपाळे यांनी राहत्या घरात लक्ष्मीपूजन केले. पूजेत दागिने व रोकड आदी ऐवज मांडला होता, मात्र रात्री झोपताना घराचा दरवाजा उघडा राहिला. ही संधी साधत चोर घरात शिरले. पूजनात मांडलेला सुमारे एक लाख ७० हजार रुपयांचा ऐवज चोराने पळवला. सकाळी चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर गोपाळे यांनी रबाळे पोलिसांत तक्रार केली. या प्रकरणाचा पोलीस तपास करीत आहेत.




## बसच्या धडकेत तरुणाचा मृत्यू; गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवनेरी बसच्या धडकेत तरुणाचा मृत्यू, तर दोघे जखमी झाल्याची घटना घडली आहे. दिघा येथे दुचाकीला बसची धडक लागल्याने हा अपघात घडला. याप्रकरणी बसचालकावर रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाणे-बेलापूर मार्गावर दिघा येथे दुचाकीला बसने धडक दिल्याने हा अपघात घडला. त्यामध्ये रोहित महाजन (वय २९) याचा मृत्यू झाला असून, संजय मोहिते व प्रवीण कडू दोघे जखमी झाले आहेत. शुक्रवारी सकाळी सुमित याच्या दुचाकीवरून तिघे जण प्रवास करत होते. त्यांची मोटरसायकल दिघा येथे आली असता, बेलापूरकडे जाणाऱ्या शिवनेरी बसने दुचाकीला धडक दिली. त्यामध्ये गंभीर जखमी होऊन रोहितचा मृत्यू झाला. तर, संजय व प्रवीण थोडक्यात बचावले.

या अपघाताप्रकरणी बसचालक अमोल सुरवसे याच्यावर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलिसांचा तपास सुरू आहे.

## २४ तासांत ३० प्रवाशांना लुटले

**नवी मुंबई :** गेल्या २४ तासांत रेल्वेच्या मध्य, पश्चिम व हार्बर मार्गावरील ३० रेल्वे प्रवाशांना भुरट्या चोरांनी लुटले. या प्रकरणी संबंधित लोहमार्ग पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. या गुन्ह्यांमध्ये २३ मोबाइल, एक पाकीट, ३ बॅगा, रोकड व सोने चोरीचे तीन घटनांचा समावेश आहे. दररोज चोऱ्या करून हे चोर एक प्रकारे लोहमार्ग पोलिसांना आव्हान देत आहेत.

## सानपाडा येथे टेम्पोच्या धडकेत तिघे जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

भरधाव टेम्पोने रिक्षाला धडक दिल्याची घटना सानपाडा येथे घडली. यामध्ये रिक्षाचालक व रिक्षातील दोन प्रवासी जखमी झाले. याप्रकरणी टेम्पोचालकावर सानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तुर्भेनाका येथे राहणारे रिक्षाचालक प्रेमराज जाधव हे सानपाडा येथून प्रवासी घेऊन तुर्भेकडे चालले होते. त्यांची रिक्षा सानपाडा येथून ठाणे-बेलापूर मार्गाच्या सर्व्हिस रोडने चालली होती. या वेळी भरधाव टेम्पोने रिक्षाला धडक दिली. त्यामध्ये रिक्षातील दोन प्रवाशांच्या पायाला दुखापत झाली. तर रिक्षाचालक जाधवदेखील जखमी झाले. या अपघात प्रकरणी टेम्पोचालक काशीनाथ पाटील (वय ३०) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## मारहाणीत पत्नी जखमी

**नवी मुंबई :** दारूच्या नशेत पतीने केलेल्या मारहाणीत पत्नी जखमी झाल्याची घटना घणसोली सेक्टर १६मध्ये घडली. शनिवारी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास पती मद्यधुंद अवस्थेत घरी आला असता, पती-पत्नीमध्ये भांडण झाले. त्यावेळी पतीने पत्नीला मारहाण केली असता, तिचा हात फॅक्चर झाला. या प्रकरणी पतीविरोधात रबाळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## हद्दपार गुन्हेगाराला पोलिसांकडून अटक

**नवी मुंबई :** लोकसभा निवडणुकीदरम्यान तुर्भे एमआयडीसी परिसरातून हद्दपार गुन्हेगाराला पोलिसांनी अटक केली आहे. सहा महिन्यांपूर्वी त्याच्यावर तडीपारीची कारवाई केलेली असतानाही तो शहरात मिळून आला. तुर्भे एमआयडीसी पोलिसांकडून आंबेडकर नगर व परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवले जात होते. यादरम्यान हद्दपार केलेला एक गुन्हेगार परिसरात वावरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून गस्ती पथकाने अस्लम ख्वाजामिया शेख उर्फ बाबू काल्या (वय २४) याला अटक केली.

## कोपरखैरणेमध्ये फटाक्यांवरून हाणामारी

**नवी मुंबई :** दारासमोर फटाके फोडण्यावरून दोन कुटुंबात हाणामारी झाल्याची घटना कोपर खैरणे सेक्टर ४ मध्ये घडली आहे. मुले फटाके फोडत असताना दुसऱ्या कुटुंबाने दारासमोर फटाके वाजवण्यास विरोध केला. यावरून दोन्ही कुटुंबात शाब्दिक वाद झाला असता वाद अधिक वाढल्याने त्यांच्यात हाणामारी झाली. यामध्ये दोन्ही कुटुंब व त्यांचे नातेवाईकदेखील भांडणात उतरल्याने त्यांच्यात जबर हाणामारी झाली. याप्रकरणी संबंधितांवर कोपर खैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## किल्ले बांधणी स्पर्धेला प्रतिसाद





**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

स्वराज्याचे तोरण ज्याने बांधले त्या छत्रपती शिवरायासाठी दिपावलीचा एक दिवा जिजाऊंसाठी जिने स्वराज्य रक्षकाला जन्म दिला आणि एक दिवा छत्रपती संभाजी राजांसाठी जे मुघलांपुढे अखेरच्या श्वासापर्यंत झुकले नाहीत. त्यांच्या स्मृतीस उजाळा म्हणून सारडे विकास मंच आणि कोमनादेवी ऑक्सिजन पार्क उरण तर्फे मुलांना गडकिल्ल्यांच महत्व आणि माहिती व्हावी यासाठी दरवर्षी किल्ले स्पर्धेचे आयोजन केले जाते.

यावर्षी देखील मोठ्या उत्साहात स्पर्धा झाली. स्पर्धेत ५६ स्पर्धकांनी सहभाग दर्शविला यावर्षी या स्पर्धेचा प्रथम मानकरी निल सुशांत म्हात्रे यांनी मुरूड जंजिरा किल्ल्याची प्रतिकृती तयार केली होती तर द्वितीय क्रमांक श्रीवेद राजेश म्हात्रे यांनी सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रतिकृती तयार केली होती. उत्तेजनार्थ ओम समीर पाटील यांनी रायगड किल्ल्याची प्रतिकृती तयार केली होती. अशांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. इतर स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वच स्पर्धकाना दिपावलीची सुंदर भेट वस्तू देण्यात आली स्पर्धेसाठी शिव व्याख्याते धिरेंद्र ठाकूर यांनी शिवरायाचे गडकिल्ले याबद्दल सुंदर माहिती सर्वांना माहिती दिली, तर किशोर पाटील यांनी आपल्या स्वर हे माझे या संगीतमय कार्यक्रम सादर केला.

या स्पर्धेसाठी खास आकर्षण म्हणजे या स्पर्धेत प्रथम द्वितीय आणि उत्तेजनार्थ आशा तीन विजेत्याना शैक्षणीक फी राकेश कडू सोनारी यांच्यामार्फत दिली जाणार आहे. या अनोळख्या संकल्पनेने राकेश कडू यांचे उपस्थितांनी आभार मानले.

या कार्यक्रमास शिव व्याख्याते धिरेद्र ठाकूर, सुयश क्लासेस आवरे अध्यक्ष निवास गावंड, सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठानचे अध्यक्ष तुकाराम गावंड, हरिश्चंद्र म्हात्रे, संतोष जोशी, सचिन पाटील विजय पाटील, प्रशांत म्हात्रे, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन उरण तालुका प्रमुख रणिता ठाकूर, डॉ. कौस्तुभ पाटील, किशोर पाटील, हरीश म्हात्रे, अमोल पाटील, राजेश पाटील, गणेश पाटील, नशीब पाटील, निलेश म्हात्रे, उज्वल पाटील, अदिती पाटील, अपूर्वा पाटील, रिया म्हात्रे, ओम, बबली, आक्षाता आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन तुकाराम गावंड संतोष जोशी तर आभार प्रदर्शन नागेंद्र म्हात्रे यांनी केले.

## रविवारची भाऊबीज मटण विक्रेत्यांना ठरली पर्वणी

**उरण : वार्ताहर**

भाऊबीजच्या दिवशी भाऊ येणार म्हणून बहिणीची ही त्याच्यासाठी जेवणाचा खास बेत असतो. तो म्हणजे चमचमीत मांसाहार, मटण मच्छीचा पाहुणचार ठरलेला असतो मग तो मटणाचे भाव गगनाला भिडले असले तरीही मटणाचा बेत भाऊबीजसाठी असणारच.

या वर्षी रविवार ३ नोहेंबर भाऊबीज आणि त्यात वीकेण्ड, रविवार म्हणजे मटण मच्छीचा खास बेत त्याकरिता सर्वत्र मटणाच्या दुकानासमोर पहाटेपासून रांगाच रांगा पुरुषांनी लावल्या आहेत. कुणी दोन चाकी, चारचाकी तर कुणी जवळचे चालत येऊन लांबच्या लांब रांगा लावल्या होत्या.



उरण तालुक्यातील जासई येथील सिराज या मटण विक्रेत्यासिराज मटन ॲण्ड चिकन शॉपमध्ये पहाटेपासूनच नागरीकांनी गर्दी केली होती. उरण तालुक्यात ठिकठिकाणी मटनाच्या दुकानांत रांगा लावल्या होत्या, असे चित्र सर्वत्र दिसत होते.

## जसखार येथे रविवारी रक्तदान शिबिर

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील जसखार येथील दिवंगत माजी ग्रामपंचायत सदस्य गुलाबभाई म्हात्रे यांच्या स्मरणार्थ गुलाबभाई म्हात्रे मित्र मंडळ जसखार यांच्या वतीने गरजू रुग्णांना जीवनदान देण्याच्या उद्देशाने दरवर्षी जसखार येथे रक्तदान शिबीराचे आयोजन केले जाते.



यंदा स्व. गुलाबभाई म्हात्रे यांच्या स्मरणार्थ रविवारी (दि.१०) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत श्री रत्नेश्वरी मंदिर, जसखार, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी गरजू व्यक्तींनी या रक्तदान शिबिरात उपस्थित अधिक संख्येने आपाआपले बहुमोल रक्तदान करावे, असे आवाहन गुलाबभाई म्हात्रे मित्र मंडळाचे सदस्य केतन म्हात्रे (९८७०९८४५४४) यांनी केले आहे.

## नोकरीच्या शोधात असलेल्याची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

नोकरीच्या शोधात असलेल्या व्यक्तीला ऑनलाईन मिळालेली नोकरी चांगलीच महागात पडली आहे. ग्राहक बनून भेटीला आलेल्या व्यक्तींनी त्यांचे दागिने व मोबाइल असा ७२ हजारांचा ऐवज लुटून नेला आहे. याप्रकरणी नेरूळ पोलीस ठाण्यात अज्ञात तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

नेरूळ परिसरात राहणाऱ्या ३६ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला. ही व्यक्ती नोकरीसाठी सोशल मीडियाद्वारे नोकरीच्या जाहिराती तपासत होते. यामध्ये त्यांना एक ऑनलाईन नोकरीची माहिती मिळाल्यावर तिथे नमूद केलेल्या संबंधित व्यक्तीला संपर्क साधला होता. या वेळी फोनवरील व्यक्तीने त्यांना ग्राहकांना विदेशी चलन भारतीय रुपयांमध्ये कन्व्हर्ट करून देण्याचे काम सांगितले होते तसेच या कामाचे महिन्याला ४० ते ५० हजार कमिशन मिळेल, असेही सांगितले.

आश्वासनाला भुलून त्यांनी कामाला होकार दिला असता रविवारी रात्री ८ च्या सुमारास त्यांना एका ग्राहकाला भेटीसाठी पाठवले होते. त्यानुसार एका हॉटेलमध्ये त्यांची तीन व्यक्तींसोबत भेट झाली असता त्यांनी, तुमच्या कंपनीने आमची फसवणूक केल्याचा आरोप करून तक्रारदार यालाच गोंधळात टाकले तसेच आमच्या नुकसानीची भरपाई पाहिजे सांगून त्यांच्या हातातील अंगठी, मोबाईल व रोकड असा ऐवज चोरी करून नेला.

याबाबत त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून नेरूळ पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.



## 'सूतिकागृह'मध्ये अत्याधुनिक पॅलिएटिव्ह व रिहॅबिलिटेशन युनिटचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील अत्याधुनिक सोयीसुविधांनी केलेले पनवेलमधील सूतिकागृह मल्टीस्पेलिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक पॅलिएटिव्ह व रिहॅबिलिटेशन युनिटचे आजच्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उदघाटन करण्यात आले.

सिप्लाच्या उल्का धुरी, सूतिकागृह मुलतीस्पेसिलीटी हॉस्पिटलचे चीफ ट्रस्टी विजय लोखंडे, लोखंडे, दीप लोखंडे, ट्रस्टी परमार, डॉ. अंजली लोमटवे, डॉ. सुजाता गायकवाड, डॉ अलित्या खान, डॉ. स्वप्नील वाघ, डॉ श्रुती, निकेश जैन, वीरा निकेश जैन आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. याबाबत माहिती देताना चीफ ट्रस्टी विजय लोखंडे यांनी सांगितले की, पुण्यानंतर प्रथमच पनवेलमध्ये अश्या प्रकारची सेवा रुग्नांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. याचा जास्तीत जास्त फायदा कॅन्सरग्रस्त रुग्ण ब्रेनस्ट्रोके रुग्ण, पॅरालिसिस रुग्ण यांना होणार आहे.

यासाठी अश्या प्रकारच्या रुग्णांच्या कुटुंबीयाने आमच्या हॉस्पिटलबरोबर संपर्क साधावा. असे आवाहन त्यांनी केले तर उल्का धुरी यांनी सुध्दा आगामी काळात आम्ही या रुग्णालयात रुग्नांना चांगली सेवा देण्याच्या उद्देशाने आरोग्य शिबिर व चांगले तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देऊ असे सांगितले.

डॉ अंजली यांनी सुद्धा सांगितले की, अश्या प्रकारच्या रुग्णांना वेगळ्या प्रकारच्या रुग्ण सेवा देणे गरजेचे असते. या हॉस्पिटलला १०० वर्षे पूर्ण होत आहे त्यामुळे नवनवीन मल्टिपर्पज सेवा येथे देण्यात येत आहे.

अश्याप्रकारच्या रुग्णांसाठी एक वेगळे दालन केले असून १० खाटा सर्व सुविधांनी युक्त असणार आहे. तरी या सुविधेचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## सारडे येथील कोमनादेवी पार्कमध्ये दिवे पेटवून दिवाळी

**उरण : प्रतिनिधी**

उरण पूर्व विभाग परिसरातील कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये चिमुकल्यांनी दिवाळीचे दिवे पेटवून एक आगळीवेगळी दिवाळी साजरी केली आहे यामुळे ऑक्सिजन पार्क मध्ये जणू तारांगण अवतरले आहे, असा आभास होत होता हे दिवे पेटवताना बाळ गोपाळांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.



एका उजाड माळरानाचं रूपांतर हिरवळीत करून उरण पूर्व विभागात ऑक्सिजन पार्क फुलवल गेलं. उरण पूर्व विभागातील सारडे गावातील घोल कोमनादेवी जंगल परिसरात माळरान होते. तिथेच पुढे बाया देवी म्हणजे सातीआसरा यांचं स्थान आहे.

आजही नागरिक या परिसरात चप्पल घालून जात नाहीत. अशा या ठिकाणी पुढे सारडे ग्रामस्थांनी पाणी आडवा पाणी जिरवा या संकल्पने खाली धरणाचा बंधारा बांधून एक डॅम बनवला. हा बंधारा बांधल्यानंतर या ठिकाणी डोंगरातून येणार तसेच पावसाचे पाणी साचू लागले व त्याचे रूपांतर एका धरणात झाले. त्यामुळे परिसरातील नागरिक या भागात येऊ लागले. या रखरखाट असणाऱ्या माळरानावर काहीतरी सुंदर फुलवावे ही संकल्पना सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांना सुचली व त्यांनी सोशल मीडियाच्या साह्याने समस्त तरुण मंडळींना अबाल वृद्धांना गोळा केले व आपल्या संकल्पनेबद्दल संबंधिताना सांगितले व प्रत्येक व्यक्तीच्या नावे त्यांनी झाडे लावली व त्यांचे संगोपन केले.

गुलाब, तुळस, वड, पिंपळ, उंबर, आंबा, जांभूळ, बदाम, सोनचाफा चाफा, काजू सिताफळ, चिकू, लिली अशी विविध जातींची झाडेही लावण्यात आली. उन्हाळ्यात झाडे सुकू नये म्हणून सारडे विकास मंचच्या माध्यमातून या झाडांना दररोज पाणी देण्यात आले. कित्येकदा वणवा पेटवण्याचा प्रयत्न काही समाजकटकांनी केला, मात्र सारडे विकास मंचाचे सदस्य खचले नाहीत त्यांनी अहोरात्र मेहनत करून ही झाडे जगवली. त्यानंतर हळूहळू हे ऑक्सिजन पार्क उदयाला आले समाजातील विविध घटकांची मदत घेऊन व स्वखर्चाने सारडे विकास मंचच्या माध्यमातून या पार्कमध्ये विविध गोष्टी आणण्यासाठी सुरुवात केली.

पर्यटकांना बसण्यासाठी बाकडे लहान मुलांना खेळण्यासाठी सी-सॉ, झोपाळे जोवर ट्रॅक अशा विविध गोष्टी या ऑक्सिजन पार्कमध्ये बसविण्यात आल्या. त्यानंतर ऑक्सीजन पार्कमधील निर्जीव दगडांनादेखील चित्राचे स्वरूप देऊन सजीव करण्यात आले आहे. यामुळे या पार्कच्या सौंदर्यात आणखीच भर पडली आहे. कुणी आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मुलांच्या वाढदिवसानिमित्त आपल्या प्रियजनांच्या स्मरणार्थ या ऑक्सिजन पार्कसाठी देणगी देऊ लागले. खरंतर ऑक्सिजन पार्क हे लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले पार्क म्हणायला हरकत नाही. कारण याची बरीचशी काम शासनाची कोणतीही मदत न घेता लोक वर्गणीतून झालेली आहेत हे या पार्कचे विशेष आकर्षण आहे.

मुंबई, नवी मुंबई, पनवेल, उरण परिसरातील कित्येक नागरिक ऑक्सिजन पार्क ला भेट देता उरण पूर्व विभागातील हे ऑक्सिजन पार्क पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. सुट्टीच्या दिवशी या ठिकाणी मोठी गर्दी पहायला मिळते. कोमणादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये दीपावली साजरी

सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे तसेच सदाबहार दोस्ती ग्रुप उरणचे संतोष जोशी, हरिश्चंद्र म्हात्रे, सई म्हात्रे, रिया म्हात्रे, अक्षता, ओम, सारा विभा दानिश, निरव याच्या सहकार्याने आज कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये दीपोत्सव साजरा करण्यात आला.

शेकडो दिव्यांची लागण करून हा परिसर आकाश मय करण्यात आला ज्याप्रमाणे घरात दीपावली साजरी करतो त्याचप्रमाणे ऑक्सिजन पार्कमध्ये दीपावली साजरी करून या ऑक्सिजन पार्कला आपले घर समजून हा उपक्रम राबविला जातो, असे मत संतोष जोशी यांनी व्यक्त करत या परिसर दिव्याच्या प्रकाशाने उजळून निघाला. सर्वांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळाला सुंदर दृश्य अनुभवयास मिळाले. सर्वांचे कोमणादेवी ऑक्सिजन पार्कचे निर्माते नागेंद्र म्हात्रे यांनी आभार व्यक्त करून सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

## आजी आजोबांसोबत दिवाळी

**पनवेल : वार्ताहर**

संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे बापदेववाडी येथील आदिवासीपाड्यात तसेच रुशिवन वृध्दाश्रम नवीन पनवेल येथील आजी आजोबांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

वृद्धाश्रमात आजी आजोबांसाठी फराळ तसेच जेवण देण्यात आले. या वेळी मधुरा गवाणकर, मानस कुलकर्णी या दोघांचा वाढदिवस आजी आजोबांसोबत केक कापून साजरा करण्यात आला.

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा सण हाच आनंदाचा क्षण संवेदना संस्थेच्या सख्या स्वत:च्या घरात दिवाळी साजरी करण्यापूर्वी आदिवासीपाडा, वृध्दाश्रमात जाऊन गेले अनेक वर्षे साजरा करत आहेत.

आपणही हीच त्याग भावना अंगी बाणवून आपल्या बरोबरच इतरांना या सणाचा आनंद देण्याचा प्रयत्न केला तर त्याचे आपणास लाभलेले समाधान खूप वेगळे आहे. प्रत्येकांनी आपली दिवाळी अशाच छान भावनेतून नक्की साजरी करावी, असे मत संस्थेच्या अध्यक्ष सुनेत्रा गवाणकर यांनी व्यक्त केले.



## निवडक

### अभिनव ज्ञानमंदिरतर्फे जनजागृती



**माणगाव** : तळा तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द विद्यालयाने शासनाच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत विधानसभा निवडणुकीसाठी वृंदावन (भानंगकोंड) येथे जनजागृती फेरी काढण्यात आली. विद्यालयातील इयत्ता ५ वी ते १० वीमधील सर्व विद्यार्थी रॅलीत सहभागी होते. घरोघरी जाऊन मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्यास सांगून याविषयी जनजागृती करण्यात आली. दिवाळीत दारात काढण्यात आलेल्या रांगोळीतूनही मतदानाचा संदेश देण्यात आला. प्रयोगशाळांतूनही रांगोळी स्पर्धेतून मतदान जनजागृती करण्यात आली. या रॅलीमध्ये शाळेचे मुख्याध्यापक सुर्वे, ज्येष्ठ शिक्षक गुजर व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सहभागी झाले होते.

### विकास कॉलनी शाळेतर्फे रॅली



**माणगाव** : स्विप मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील राजिप शाळा विकास कॉलनी येथे मतदान जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा याबाबत जनजागृती म्हणून शाळेतर्फे विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. रांगोळी, चित्रकला, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सदर उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, सुधा साळवी, शाळेच्या मुख्याध्यापिका येलवे, उपशिक्षिका गायकवाड, शालेय व्यवस्थापन कमिटी, पालक तसेच साधन व्यक्ती प्रज्ञा म्हात्रे यांनी सहभाग घेतला.

### अलिबागमध्ये पक्षीनिरीक्षण कार्यशाळा

**अलिबाग** : विद्यासन फाउंडेशन आणि बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमध्ये पक्षी निरीक्षण कार्यशाळेचे आयोजन ९ आणि १० नोव्हेंबरला करण्यात आले आहे. बीएचएनसचे तज्ज्ञ या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यासन फाउंडेशन अलिबागच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी (९९६०१६०४१९) आणि (७०३८७६८३३१) या क्रमांकावर संपर्क साधावा आणि आपला सहभाग सुनिश्चित करावा.

# विरोधक विष पेरण्याचा प्रयत्न करताहेत- आमदार गोगावले

## • निजामपूर मुस्लिम मोहल्ला येथे गाव बैठक उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यातील निजामपूर मुस्लिम मोहल्ला येथे महायुती शिवसेनेची गाव बैठक उत्साहात झाली. या बैठकीत मार्गदर्शन करताना मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार भरत गोगावले यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत विरोधक समाजात विष पेरण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगितले.

बैठकीला शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अत्तर पठाण, युवा सेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, निजामपूर सरपंच राजाभाऊ रणपिसे, शिवसैनिक सुधीर पवार, माजी सरपंच हमजा जलगावकर, विभाग प्रमुख शरीफ हर्गे, अविनाश नलावडे, नितीन पवार, गणी जनाब, मनोज सावंत, दाऊद मापकर, राजेश कदम, गणेश समेळ, इसहाक लोखंडे, गणेश पवार, अली लोखंडे, इस्माईल जलगावकर, अल्लाउद्दीन जलगावकर, मुश्ताक फटाकरे, असिफ दळवी, आदम जलगावकर, जुबेर लोखंडे, अशफाक लष्करी, इकबाल जलगावकर, शब्बीर अखवारे, मुक्तार परदेशी, सत्तार राऊत, अ.हमीद गोडमे आदींसह मोहल्ल्यातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना आमदार भरत गोगावले पुढे म्हणाले की, आम्ही आपली कामे करतो त्याचा मोबदला पाच वर्षांतून एकदा मतदानरुपी आशीर्वादाने आपल्याकडून मागत आहोत. निजामपूर मोहल्ल्यातील अंतर्गत रस्त्यांसाठी आपण ३० लाख रुपयांचा निधी दिला असून अजून रस्त्यांसाठी लागणारा ३० लाख रुपयांचा निधी निवडणुकीनंतर देण्याची जबाबदारी आम्ही स्वीकारली आहे. निजामपूर भागासाठी एमआयडीसीतून स्वछ, शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी २८ कोटी रुपयांची नळपाणी योजना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सहकार्याने मंजूर करून आणली. आम्ही कामे करतो म्हणून बोलतो असे सांगत येत्या २० तारखेला धनुष्यबाणाच्या निशाणीसमोरील बटन दाबून आपण सर्वांनी महायुतीला विजयी करा, असे आवाहन केले.

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अत्तर पठाण यांनी, भरतशेठ यांच्या मार्गदर्शनाखाली आपण मुस्लिम संघटना तयार केली आहे. या संघटनेमार्फत समाजातील लोकांचे काही प्रश्न, समस्या असल्यास ते भरतशेठ गोगावले हे मार्गी लावीत असतात. गेल्या अडीच वर्षात भरतशेठनी मतदारसंघात ३७०० कोटी रुपयांचा विकासनिधी आणला. आपल्याला भरतशेठ यांच्या रूपाने हक्काचा आमदार मिळाला आहे. कोणी विरोधक काही चुकीचे सांगत असेल तर त्याकडे कोणी लक्ष न देता आपल्याला भरत गोगावले यांना प्रचंड मतांनी निवडून आणायचे असल्याचे यांनी सांगितले.

अमजदभाई यांनी, आपल्या मार्गदर्शनात बोलताना, एक मंत्री आणू शकत नाही तेवढा विकासनिधी आमदार भरत गोगावले यांनी आपल्या महाड मतदारसंघात आणला. ज्येष्ठ नेते गणी जनाब यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना, आमदार भरत गोगावले यांनी निजामपूर गावात भरपूर विकासकामे केली असल्याने त्यांना आपल्याला निवडून द्यायचे आहे, असे सांगत धनुष्यबाण पुन्हा एकदा वर गेले पाहिजे असे सांगितले. माजी सरपंच हमजा जलगावकर यांनी, आमदार भरत गोगावले यांच्या रूपाने गोरगरीब जनतेला एक आधार आहे. येत्या २० नोव्हेंबरला आपल्याला भरतशेठना भरघोस मतांनी निवडून आणून त्यांना विकासकामांची पोचपावती द्यायची आहे, असे सांगितले.

### 'रायगडात सातही उमेदवार विजयी होतील'

*महायुतीचे सर्व खासदार निवडून आले होते. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यात सातही विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे सातही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होणार असून महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार आहे, असा विश्वास आमदार भरत गोगावले यांनी माणगाव येथील कार्यकर्ता दिपावली शुभेच्छा कार्यक्रमात व्यक्त केला. महाड विधानसभा मतदारसंघात प्रत्येक कार्यकर्ता स्वतः भरत गोगावले बनून कामाला लागला आहे. लाडक्या बहिणी, लाडके भाऊ आणि कार्यकर्ते वाडीवस्तीत जाऊन प्रचार करीत आहेत. या तिनही तालुक्यात कोट्यवधी रुपयांची विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामुळे आमचा विजय निश्चित होणार असून या वेळी अंदाजे ५० हजारपेक्षा जास्त मतांनी विजयी होणार आहे, असा विश्वास आमदार भरत गोगावले यांनी व्यक्त केला.*

# कर्जतमध्ये उबाठा आणि शरद पवार गटाला खिंडार

### पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**चौक, कर्जत : प्रतिनिधी**



राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजिप माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, उबाठा गटाचे राजिप माजी उपाध्यक्ष भाई शिंदे, कर्जत-खालापूर संपर्क प्रमुख आणि खोपोली नगरपालिकाचे माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील पाटील यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

कर्जत-खालापूर विधानसभा महायुतीचा मेळावा सोमवारी कर्जत पोसरी येथे झाला. या वेळी हा पक्षप्रवेश झाला. राजिपचे अध्यक्ष असताना त्यांनी जनतेसाठी काम केले आहे. डॉ. सुनील पाटील हे मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचे राज्य समन्वयक आहेत. गेली २५ वर्षे ते खोपोली नगरपालिका येथे नगरसेवक असून नगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे. भाई शिंदे हे शिवसेनेचे खालापूर तालुकाप्रमुख होते. राजिपचे उपाध्यक्षही होते.

मेळाव्यासाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, वसंत भोईर, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, भाजप महिला उपाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजप जिल्हा चिटणीस दीपक बेहेरे, संपर्कप्रमुख विजय पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोस्ते आदिवासीवाडी येथील एका २५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. सदरची घटना सोमवारी (दि.४) रात्री ११ वा.च्या सुमारास घडली. याबाबत गोपाळ बारक्या जाधव (वय ५२, रा. कोस्ते आदिवासीवाडी) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात माहिती दिली.

अनिल गोपाळ जाधव (वय २५) याने कोणत्यातरी अज्ञात कारणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याचे वडिल गोपाळ बारक्या जाधव यांनी त्याला खाली उतरवून माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात आणले असता येथील डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार तुणतुणे हे करीत आहेत.

# आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रचाराचा रेवदंड्यातून श्रीगणेशा

**रेवदंडा : प्रतिनिधी**



रेवदंड्याचे आराध्यदैवत श्री मारूतीरायाचे चरणी श्रीफळ वाढवून महायुतीचे अलिबाग-मुरूड विधानसभा उमेदवार आमदार महेंद्र दळवी यांनी श्रीफळ वाढवून प्रचाराचा श्रीगणेशा केला.

ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे निवासस्थानानजिक असलेल्या पारनाका येथील रेवदंडा शहराचे आराध्यदैवत श्री मारूतीरायाचे चरणी श्रीफळ वाढवून आमदार महेंद्र दळवी यांनी श्रीफळ वाढवून प्रचाराचा श्रीगणेशा केला. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, शिवसेना तालुकाध्यक्ष अनंत गोंधळी, राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हा सचिव आशिष भट, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, सामाजिक कार्यकर्ते शरद गोंधळी, उपसरपंच मंदाताई बळी, माणिक बळी, भाजपचे दिलीप पटेल, विश्वास जोशी, संकेत जोशी, प्रकाश दांडेकर, तसेच ग्रामपंचायत सदस्या मानकर, सदस्य दुशांत झावरे, सुराराम माळी, प्रवीण राउत, प्रवीण घरत, जिल्हा युवा सेना पदाधिकारी हर्षल घरत, सलिम तांडेल, रूही तांडेल, महिला शिवसेना उपतालुका प्रमुख विनोदिनी कोंडे, विभागप्रमुख संतोष कोंडे, शाखाप्रमुख सुरेल कोंडे, शाखाप्रमुख धनजंय कोंडे, भारती मोरे, ताराचंद कोंडे, रेवदंडा शहर महिला अध्यक्षा शलाका राऊत, रेवदंडा शहर अध्यक्ष योगेश पिटनाईक, केदार खोत, विजय हाडकर, समीर आठवले, विवेक दांडेकर, चंद्रकांत दांडेकर, मंगेश वडके, प्रमोद म्हात्रे, प्रसाद गोंधळी, विधानसभा महिला उपसंघटके तनुजा घरत, भूषण घरत, ज्योती मुंबईकर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत मनुष्यबळाची दुसरी सरमिसळ

**रायगड : रामप्रहर वृत्त**



जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सामान्य निवडणूक निरीक्षक रुही खान, सतीश कुमार एस. आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील मनुष्यबळाची दुसरी जिल्हास्तरीय सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रवींद्र शेळके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी निलेश लांडगे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता एकूण दोन हजार ८२० मतदान केंद्राकरीता १४ हजार २१६ इतकी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. जिल्ह्यात उपलब्ध कर्मचारी संख्या १५ हजार १६९ इतकी आहे. या सर्व कर्मचाऱ्यांची सरमिसळ प्रक्रिया करण्यात आली.

पनवेल विधानसभा मतदारसंघात एकूण ६०४ मतदान केंद्र असून तीन हजार ७४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदारसंघासाठी तीन हजार ४८७ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघात एकूण ३६२ मतदान केंद्र असून एक हजार ९३४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदारसंघासाठी एक हजार ९६१ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.उरण विधानसभा मतदार संघात एकूण ३५५ मतदान केंद्र असून एक हजार ८६९ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदारसंघासाठी एक हजार ८९३ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

पेण विधानसभा मतदारसंघात एकूण ३८० मतदान केंद्र असून दोन हजार २४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदारसंघासाठी दोन हजार ३६० मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. अलिबाग विधानसभा मतदारसंघात एकूण ३७५ मतदान केंद्र असून एक हजार ९८३ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदारसंघासाठी एक हजार ९९२ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात एकूण ३५१ मतदान केंद्र असून एक हजार ६५८ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदारसंघासाठी एक हजार ७३४ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

महाड विधानसभा मतदारसंघात एकूण ३९३ मतदान केंद्र असून एक हजार ६७४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदारसंघासाठी एक हजार ७४० मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

# खोपोलीतील चिमुकल्यांनी दिला किल्ले संवर्धनाचा संदेश

**खोपोली : प्रतिनिधी**



दिवाळी या सणामध्ये किल्ले बनविण्याची बच्चेकंपनीची स्पर्धाच पहावयास मिळाली. यातून लहानग्यांनी किल्ले जतन करण्याचा संदेश दिला.

किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, सैन्य, तोफ, वाघ, हती, हरीण असे विविध प्राणी ठेवून सजावट करण्यात आली होती. तटबंदीसाठी चुनखडीचा वापर करून रंगविण्यात आले होते. किल्ल्यांचे संवर्धन व्हावे हा संदेश देण्याच्या उद्देशाने किल्ले बनविण्यात येत असल्याचे सार्थक काठावले, जीवन काठावले, निल काठावले, वेदु काठावले, यज्ञेश पाटील यांनी सांगितले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष जयेश पाटील, दिलीप काठावले, गजानन काठावले, संदीप काठावले, किशोर काठावले, निखिल काठावले उपस्थित होते.

# श्री बालदिगंबराचे दर्शन घेऊन सुधाकर घारेंचा प्रचार सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत मतदारसंघातील परिवर्तन विकास आघाडीचे अपक्ष उमेदवार सुधाकर परशुराम घारे यांनी आपल्या प्रचाराचा शुभारंभ मंगळवारी (दि.५) कडाव येथील श्री बालदिगंबर चरणी नतमस्तक होऊन दर्शन घेऊन केला. त्यांनी आपली निशाणी रिक्षा असल्याने रिक्षांचा मोठा ताफा नेऊन वातावरण निर्मिती केली.

या वेळी अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, भरत भगत, भगवान भोईर, धोंडू राणे, राजाभाऊ कोठारी, दीपक श्रीखंडे, सुनील हारपुडे, ॲड. रंजना धुळे, ॲड. पूजा थोरवे, भारती पालकर, मधुरा चंदन, ड. स्वप्नील पालकर, अरुण हरपुडे, बळीराम देशमुख, नमिता घारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# अलिबाग लायन्स क्लबच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**



लायन्स क्लब अलिबाग आणि दी झोन फिटनेस जिमने श्री स्वामी समर्थ मठाजवळ रक्तदान शिबिर आयोजित केले होते.

या वेळी विविध रक्तगट नमुने संकलित झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. प्रमुख उपस्थितांमध्ये डिस्ट्रिक्ट को-ऑर्डिनेटर लायन नयन कवळे, लायन्स क्लब ऑफ अलिबाग सचिव महेश कवळे, पास्ट प्रेसिडेंट अविनाश राऊळ, जॉइंट सेक्रेटरी नितीन शेडगे, दी झोन फिटनेसचे मालक भरत चंडेला, शासकीय रुग्णालयातील रक्तपेढी विभागाच्या रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. शीतल स्वामी, वैभव कांबळे आदींसह कर्मचारी आणि रक्तदाते उपस्थित होते.

या वेळी डॉ. शीतल स्वामी यांनी उपस्थितांना रक्तदानाची आवश्यकता, ते केव्हा आणि कसे करावे, विविध रक्तगट, युनिव्हर्सल रिसिव्हर, युनिव्हर्सल डोनर, रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण, व्यसनांपासून दूर राहणे, आपले आरोग्य, आहार या महत्त्वाच्या विषयांवर रक्तदात्यांशी संवाद साधून याबाबत जनजागृती केली.

# ऑस्ट्रेलिया दौऱ्यातही फिरकीचे आव्हान

## टीम इंडियाविरुद्ध लायन ठरू शकतो गेमचेंजर

**पर्थ : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय फलंदाजांची कामगिरी अत्यंत खराब होती. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारखे बलाढ्य फलंदाजही धावांसाठी झुंजताना दिसले. 'किवी' फिरकीपटूंनी भारतीय फलंदाजांना सर्वाधिक त्रास दिला. आता ऑस्ट्रेलियालाही याचा फायदा घ्यायचा आहे. ऑस्ट्रेलियाकडे नॅथन लायनसारखा अनुभवी ऑफस्पिनर आहे. त्यामुळे टीम इंडियाला सावध राहण्याची गरज आहे.

पुणे आणि मुंबईत न्यूझीलंडविरुद्धची फिरकी गोलंदाजी भारतीय फलंदाजांसाठी मोठी डोकेदुखी ठरली. दुसऱ्या कसोटीत मिचेल सँटनरने एकट्याने १३ बळी घेत खळबळ उडवून दिली, तर तिसऱ्या कसोटीत एजाज पटेल आणि ग्लेन फिलिप्सने चमकदार कामगिरी केली. अशा स्थितीत भारतीय फलंदाज फिरकीच्या जाळ्यात बुचकळ्यात पडत असल्याचे स्पष्ट होत असून आगामी बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये नॅथन लायनही याचा फायदा उठवताना दिसेल.



ऑस्ट्रेलियात वेगवान गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले आणि कहर केला असला तरी ॲडलेड आणि सिडनीमध्ये फिरकी गोलंदाज प्रभावी ठरतात. अशया स्थितीत नॅथन लियॉनचाही ऑस्ट्रेलियात उत्कृष्ट विक्रम आहे. तो कसोटीत त्याच्या संघाच्या गोलंदाजीतील महत्त्वाचा स्पीनर आहे.

अशा स्थितीत ऑस्ट्रेलियाच्या घातक वेगवान गोलंदाजांना तसेच नॅथन लायनला तोंड देण्याचे आव्हान भारतीय फलंदाजांसमोर असेल. त्यामुळे टीम इंडियासाठी या वेळी ही बाब सोपी जाणार नाही. न्यूझीलंडविरुद्ध लज्जास्पद कामगिरी करणारे भारतीय फलंदाज ऑस्ट्रेलियात पुनरागमन करण्याचा मार्ग कसा शोधतात हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. बॉर्डर-गावसकर ट्रॉफी २०२४-२५ची सुरुवात २२ नोव्हेंबरला पर्थ कसोटीने होणार आहे.

### पाहुण्यांचा भरपूर अनुभव

नॅथन लायन या ऑफस्पिनरला भारताविरुद्धही खेळण्याचा भरपूर अनुभव आहे. लायनने भारताविरुद्ध १००हून अधिक कसोटी बळी घेतले आहेत. ऑस्ट्रेलियात खेळताना त्याने टीम इंडियाविरुद्ध ६० विकेट घेतल्या आहेत. या गोलंदाजाच्या खात्यात एकूण ५००हून अधिक कसोटी विकेट्स आहेत. अशा परिस्थितीत लायनलाही आपल्या फिरकीने चमत्कार करायला आणि भारताच्या बँडसाठी खेळायला आवडेल.

# रोहित उपलब्ध नसेल, तर बुमराहला कर्णधार करा

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील निराशाजनक कामगिरीनंतर आता आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील पहिल्या दोन सामन्यांसाठी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा उपलब्ध नसल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत रोहितबाबत बीसीसीआयने कठोर निर्णय घ्यायला हवेत, असे रोखठोक मत लिटल मास्टर सुनील गावसकर यांनी व्यक्त केले आहे.



### गावसकरांचा 'स्टेट ड्राईव्ह'

अशी माहिती मिळत आहे की, रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या पहिल्या कसोटीला मुकणार आहे. काही वृत्तानुसार तो दुसरी कसोटीही खेळू शकणार नाहीये. जर हे खरं असेल तर मला वाटते, भारतीय निवडकर्त्यांनी त्याला स्पष्टपणे सांगायला हवे की तुला विश्रांती घ्यायची असेल तर तू जरूर आराम कर. तुझी कारणे वैयक्तिक असतील तर तू त्याकडे लक्ष दे, पण जर तू जर संपूर्ण मालिकेतील दोन तृतीयांश मालिकेत उपलब्ध नसशील तर मालिकेतील उर्वरित सामने फक्त एक खेळाडू म्हणून खेळ. आम्ही सध्याचा उपकर्णधार असलेल्या जसप्रीत बुमराहला या दौऱ्यावर कर्णधार करतो, असे अत्यंत सडेतोड मत गावसकर यांनी मांडले.

भारतीय क्रिकेट हा सध्या चर्चेचा विषय होत चालला आहे. आपण जर न्यूझीलंडविरुद्धची मालिका ३-०ने जिंकलो असतो तर परिस्थिती वेगळी असती, पण आपण ३-०ने मालिका गमावली आहे. अशा वेळी भारताला कर्णधाराची पूर्ण वेळ गरज असणार आहे. मनोबल खचलेल्या संघाला एकत्रित करण्याची जबाबदारी कर्णधारावर असते. त्यामुळे दौऱ्याच्या सुरुवातीला कर्णधारच नसेल तर अशा वेळी दुसऱ्या कुणालातरी कर्णधार करणे हेच योग्य आहे, असेही गावसकर म्हणाले.

दरम्यान, आतापर्यंत जसप्रीत बुमराहने एका कसोटीत भारताचे नेतृत्व केले आहे. हा सामना इंग्लंडविरुद्ध बर्मिंगहॅम येथे २०२२मध्ये खेळला गेला होता. या सामन्यात इंग्लंडने शेवटच्या डावात ३७८ धावांचे आव्हान पार करून सामना सात गडी राखून जिंकला होता.

# सामन्यादरम्यान वीज पडून खेळाडूचा मृत्यू; पाच जण जखमी

**हुआनकायो : वृत्तसंस्था**

दक्षिण अमेरिकन देश पेरूच्या हुआनकायो शहरात फुटबॉल सामन्यादरम्यान वीज पडून एका खेळाडूचा मृत्यू झाला. यासह अन्य पाच जण जखमी झाले. ही घटना चिल्का जिल्ह्यात घडली, जिथे स्थानिक संघ जुव्हेंटुड बेलाविस्ताचा सामना फॅमिलिया चोकाशी होत होता.

या दुर्घटनेत ३९ वर्षीय बचावपटू जोस ह्यूगो डे ला क्रूझ मेझा याचा मृत्यू झाला. विजेचा धक्का लागल्याने तो जमिनीवर कोसळल्याचे व्हिडीओ फुटेजमध्ये दिसत आहे. त्याला तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले, मात्र त्याला वाचवता आले नाही. यासोबतच ४० वर्षीय गोलरक्षक जुआन चोक्का लक्ता हाही गंभीर भाजला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

वृत्तानुसार, १६ आणि १९ वयोगटातील दोन खेळाडू आणि २५ वर्षीय क्रिस्टियन सेझर पिटूय काहुआना, ज्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

सामन्याच्या २२व्या मिनिटाला जेव्हा बेलाविस्टा २-०ने आघाडीवर होता, तेव्हा जोरदार विजेचा कडकडाट झाला. त्यामुळे रेफरीने खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला, मात्र खेळाडू मैदान सोडण्यापूर्वीच वीज पडली. याच वर्षी फेब्रुवारीमध्ये एका इंडोनेशियन फुटबॉलपटूचाही विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला होता.

# ...तर रोहित कसोटीतून निवृत्त होऊन वनडे सामने खेळेल

## दिग्गज क्रिकेटर के. श्रीकांतची भविष्यवाणी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाच्या ऐतिहासिक पराभवानंतर स्टार क्रिकेटर्सच्या भविष्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. चाहते दोन खेळाडूंना सर्वाधिक लक्ष्य करत आहेत. एक म्हणजे कर्णधार रोहित शर्मा, तर दुसरा आहे विराट कोहली. रोहित शर्मा सध्या फलंदाजीबरोबरच कर्णधार म्हणून संघ सांभाळण्यातही अपयशी ठरताना दिसत आहे. याबाबत माजी कर्णधार कृष्णमाचारी श्रीकांत यांना विचारले असता, त्यांनी रोहितच्या संभाव्य निवृत्तीसंदर्भात दावा केला, तर विराटसाठी आणखी बराच वेळ असल्याचे म्हटले आहे.

सचिन तेंडुलकरच्या पदार्पणाच्या सामन्यात कर्णधार असलेले के. श्रीकांत भारताच्या पराभवामुळे संतापले आहे. त्यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनलवर संघातील अनेक उणिवा सांगितल्या आहेत. रोहित शर्माच्या फलंदाजीसंदर्भात विचारले असता ते म्हणाले, रोहितने स्लिपमध्ये ज्या प्रकारे झेल दिला आणि नंतर पुल करताना आऊट झाला हा चिंतेचा विषय आहे.



या वेळी संघात बदल आणि त्याच्या पुनर्रचनेवर काम करण्याची आवश्यकता आहे का? या संदर्भात बोलताना श्रीकांत म्हणाले, निश्चितच. १०० टक्के. आपल्याला पुढचा विचार करावा लागेल. जर भारताने ऑस्ट्रेलियात चांगली कामगिरी केली नाही, तर रोहित कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीही जाहीर करू शकतो, मात्र तो एकदिवसीय सामने खेळत राहील, असे मला वाटते.

### विराटकडे अद्याप बराच वेळ

विराट कोहलीच्या निवृत्तीसंदर्भात विचारले असता श्रीकांत म्हणाले, या संदर्भात बोलने फार घाईचे होईल, असे मला वाटते. त्याच्याकडे (कोहली) अद्याप बराच वेळ आहे. तो ऑस्ट्रेलियात पुनरागमनही करू शकतो. ऑस्ट्रेलियात त्याची कामगिरीही चांगली राहिली आहे.

# भारताच्या पराभवाने ऑस्ट्रेलियन खेळाडू खूश

## बॉर्डर-गावसकर ट्रॉफीपूर्वी शाब्दिक खेळी

**सिडनी : वृत्तसंस्था**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत क्लीन स्वीपचा सामना करावा लागला. भारताला आता २२ नोव्हेंबरपासून ऑस्ट्रेलियात बॉर्डर-गावसकर चषक स्पर्धा खेळायची आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच कसोटी सामन्यांची मालिका होणार आहे. न्यूझीलंडकडून भारताच्या दारुण पराभवामुळे ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड आनंदी आहे. भारतीय खेळाडू जेव्हा बॉर्डर-गावसकर ट्रॉफीत प्रवेश करतील तेव्हा त्यांचा आत्मविश्वास डळमळीत होईल आणि त्याचा फायदा ऑस्ट्रेलियाला मिळेल, असे हेझलवूडला वाटते.

हेझलवूडने सिडनी मॉर्निंग हेराल्डला सांगितले की, क्लीन स्वीपनंतर ते



(भारतीय खेळाडू) पुनरागमन करू शकतात. त्यांचा ३-० असा पराभव ३-०ने जिंकण्यापेक्षा चांगला आहे. या आत्मविश्वासाला थोडा धक्का बसला असेल. त्यांच्या संघाचे अनेक फलंदाज ऑस्ट्रेलियात खेळले आहेत, पण काही फलंदाजांसाठी येथील मैदान नवखे आहे. त्यामुळे ते गोष्टींबद्दल थोडे अनिश्चित असतील. मला वाटत नाही की, तुम्ही त्यात जास्त अंदाज लावू शकता. साहजिकच निकाल आमच्यासाठी चांगला आहे. याचे श्रेय न्यूझीलंडच्या खेळाडूंना जाते. त्यांनी उत्कृष्ट क्रिकेट खेळले.

# घटस्फोटानंतर 'गब्बर' पुन्हा प्रेमात?

**मुंबई : प्रतिनिधी**

सोशल मीडियावर विविध व्हीडिओच्या माध्यमातून कायमच चर्चेत असलेला क्रिकेटपटू म्हणजे शिखर धवन. क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केलेल्या धवनचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो एका नवीन मुलीबरोबर दिसत आहे.

शिखर धवन मिस्ट्री गर्लबरोबर मुंबई विमानतळावर स्पॉट झाला होता आणि तेथील त्याचा हा व्हिडीओ सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. धवनबरोबर दिसणारी ही नवी मिस्ट्री गर्ल कोण आहे याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही, पण धवन आता घटस्फोटानंतर पुन्हा एकदा प्रेमात पडला आहे आणि तो या मुलीशी लग्न करणार का असे बरेच प्रश्न चाहत्यांमध्ये सुरू आहेत.

### मिस्ट्री गर्लबरोबर शिखर धवनचा व्हिडीओ



धवनबरोबरच ती मिस्ट्री गर्लसुद्धा कारमधून उतरली. यानंतर ती कॅमेऱ्याकडे पाठमोरी उभी होती. इतकंच नव्हे तर ही कोणी भारतीय नसून विदेशी आहे. एअरपोर्टमध्ये आत जाईपर्यंत ती धवनपासून खूप लांब आणि मागे उभी होती, जेणेकरून त्या दोघांचा कोणी एकत्र फोटो क्लिक करू नये.

शिखर धवन आणि त्याची पत्नी आयेशा मुखर्जी यांचा गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये घटस्फोट झाला. धवन आणि आयेशा यांना झोरावर नावाचा एक मुलगाही आहे, मात्र, आता धवन नव्या मिस्ट्री गर्लबरोबर दिसल्याने चर्चांना उधाण आले आहे, पण धवनने मात्र अद्याप याबाबत अधिकृत काहीही जाहीर केलेले नाही.

# ऑस्ट्रेलियाला नशिबाची साथ मिळाली -रिझवान



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

पहिल्या वनडे सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा दोन गडी राखून पराभव केला. मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर झालेल्या या लढतीत पाकिस्तानी गोलंदाजांनी संघर्ष केला, पण पॅट कमिन्सने त्यांच्या तोंडचा घास पळवला. पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवानने सामन्यानंतर एक मोठे विधान केले.

पाकिस्तानने दिलेल्या २०३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना 'कांगारूं'ना घाम फुटला. शाहीन आफ्रिदी, हारिस रौफ आणि नसीम शाह या पाकिस्तानच्या त्रिकुटाने यजमान संघाच्या फलंदाजांची डोकेदुखी वाढवल्याने सामना चुरशीचा झाला. सामन्यानंतर मोहम्मद रिझवान म्हणाला की, ऑस्ट्रेलियाला नशिबाची साथ मिळाली, म्हणूनच त्यांचा पहिल्या सामन्यात विजय झाला तसेच परिस्थिती कोणतीही असली, धावसंख्या कमी असली तरी अखेरपर्यंत लढायचे या हेतूने आम्ही मैदानात उतरतो.

या मालिकेतील दुसरा सामना शुक्रवारी डिलेड येथे होणार आहे. त्यामुळे पाकिस्तानसमोर मालिकेत बरोबरी साधण्याचे आव्हान असेल, तर ऑस्ट्रेलिया विजयरथ कायम ठेवून मालिका जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल.

# आयपीएलच्या मेगा लिलावाबाबत नवी अपडेट

## २४, २५ नोव्हेंबरला प्रक्रिया? स्टार खेळाडू होणार मालामाल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या १८व्या हंगामापूर्वी सर्व संघांनी रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. यानंतर आता आयपीएल २०२५बाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. आगामी हंगामापूर्वी मेगा लिलाव कधी आणि कुठे होणार या संदर्भात माहिती पुढे आली आहे.



वृत्तसंस्था एनएनआयनुसार आयपीएल २०२५साठी मेगा लिलाव या महिन्याच्या अखेरीस रियाधमध्ये होऊ शकतो. रिपोर्टनुसार रियाधमध्ये २४ आणि २५ नोव्हेंबर दरम्यान हा लिलाव होऊ शकतो. मेगा लिलावात अनेक स्टार खेळाडू तुफान कमाई करतील अशी शक्यता आहे. यामध्ये जोश बटलर, एडन मार्करम, ग्लेन मॅक्सवेल, फाफ डू प्लेसिस, केएल राहुल, ऋषभ पंत आणि श्रेयस अय्यर यांसारख्या स्टार खेळाडूंचा समावेश आहे.

मेगा लिलावापूर्वी सर्व १० फ्रँचायझींनी मिळून एकूण ५५८.५० कोटी रुपये खर्च करून ४६ खेळाडूंना कायम ठेवले. यामध्ये ३६ खेळाडू भारतीय, तर १० विदेशी खेळाडूंचा समावेश आहे. ३६ भारतीयांमध्ये १० अनकॅप्ड खेळाडूदेखील आहेत. कोलकाता नाइट रायडर्सने कर्णधार श्रेयस अय्यरला, दिल्ली कॅपिटल्सने कर्णधार रिषभ पंतला, तर लखनौ सुपर जायंट्सने कर्णधार केएल राहुलला करारमुक्त केले आहे. अशा स्थितीत अनेक फ्रँचायझी या कर्णधारांवर लिलावात मोठी बोलू लावण्याची चर्चा आहे.

### सर्व संघांनी रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी

- **राजस्थान रॉयल्स :** संजू सॅमसन, यशस्वी जैस्वाल, रियान पराग, ध्रुव जुरेल, शिमरॉन हेटमायर, संदीप शर्मा.
- **कोलकाता नाइट रायडर्स :** रिंकू सिंग, वरुण चक्रवर्ती, सुनील नरेन, आंद्रे रसेल, हर्षित राणा, रमणदीप सिंग.
- **मुंबई इंडियन्स :** जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या, रोहित शर्मा, तिलक वर्मा.
- **चेन्नई सुपर किंग्ज :** ऋतुराज गायकवाड, मथिशा पाथिराना, शिवम दुबे, रवींद्र जडेजा, एमएस धोनी.
- **दिल्ली कॅपिटल्स :** अक्षर पटेल, कुलदीप यादव, ट्रिस्टन स्टब्स, अभिषेक पोरेल.
- **गुजरात टायटन्स :** राशिद खान, शुभमन गिल, साई सुदर्शन, राहुल तेवतिया, शाहरुख खान.
- **लखनौ सुपर जायंट्स :** निकोलस पूरन, रवी बिश्नोई, मयंक यादव, मोहसीन खान, आयुष बडोनी.
- **सनरायझर्स हैदराबाद :** पॅट कमिन्स, अभिषेक शर्मा, नितीश कुमार रेड्डी, हेनरिक क्लासेन, ट्रॅव्हिस हेड.
- **रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू :** विराट कोहली, रजत पाटीदार, यश दयाल.
- **पंजाब किंग्स :** शशांक सिंग, प्रभसिमरन सिंग.

# वाढदिवसानिमित्त विराटला चाहत्याकडून गिफ्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा अव्वल फलंदाज विराट कोहलीचा मंगळवारी (दि. ५) वाढदिवस साजरा झाला. या वाढदिवसापूर्वीच एका चाहत्याकडून त्याला खास गिफ्ट मिळाले.

विराट कोहली सध्या खराब फॉर्मशी झुंज देत आहे. बांगलादेशनंतर न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत विराट सपशेल अपयशी ठरला. विराटचा हा वाईट टप्पा त्याच्या वाढदिवसाच्या आणि टीम इंडियाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या अगदी आधी आला आहे. अशा वेळी विराटच्या फॉर्ममध्ये परतण्यासाठी सर्वजण प्रार्थना करत आहेत.

विराटचा मंगळवारी ३६वा वाढदिवस होता. या वाढदिवसापूर्वी त्याला एक चाहता खास गिफ्ट देतानाचा व्हिडीओ



समोर आला आहे. यामध्ये एका चाहत्याने त्याला हनुमानाचा फोटो भेट दिला, कारण विराट हा हनुमंताचा भक्त आहे.

### कुटुंबासोबत सेलिब्रेशन

दरम्यान, याआधी विराट क्रिकेट सामन्यांतून वेळ मिळाल्यावर पत्नी अनुष्कासोबत लंडनमध्ये वास्तव्याला पसंती देताना दिसला आहे, पण किंग कोहलीने ३६वा वाढदिवस पत्नी अन् मुलांसोबत मायदेशात साजरा करण्याला पसंती दिली. कोहली हा त्याच्या स्वत:च्या मालकीच्या रेस्टॉरंटमध्ये स्पॉट झाला. या वेळी त्याने अनुष्कासोबत फोटोसाठी पोज देत पापाराझीं गप्पागोष्टी केल्या.

# इमेन खलिफ स्त्री नव्हे पुरुष?

**अल्जियर्स : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक जिंकणारी महिला बॉक्सर अल्जेरियाची इमेन खलिफ पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ती पुरुष असल्याचे एक वैद्यकीय अहवालात नमूद करण्यात आले आहे.

रिपोर्ट्सनुसार वैद्यकीय अहवालात असे आढळून आले आहे की खलीफमध्ये अंडकोष आणि दध गुणसूत्र (पुरुष गुणसूत्र) आहेत, जे फाईव अल्फा रिडक्टेज अपुरेपणा नावाचा विकार असल्याचे लक्षण आहे. पॅरिस ऑलिम्पिकदरम्यानही खलिफविरुद्ध खेळणाऱ्या काही महिला बॉक्सर्सनी हावभावातून हे सूचित केले होते, मात्र त्या वेळी ऑलिम्पिक समितीने खलिफच्या खेळावर कोणतीही बंदी घातली नव्हती. खलीफने या सामन्यात चीनच्या यांग लिऊचा ५-० असा पराभव करत सुवर्णपदक जिंकले होते.

# युझवेंद्र चहलची पत्नी धनश्रीच्या ग्लॅमरस अदा

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा स्टार खेळाडू युझवेंद्र चहल त्याच्या विनोदी शैलीसाठी प्रसिद्ध आहे. कधी खेळाडू, तर कधी पंचांसोबत तो मस्ती करताना दिसतो. त्याची पत्नी धनश्रीने काही लेटेस्ट फोटो शेअर केले आहेत. तिच्या घायाळ करणाऱ्या अदा चाहत्यांचे लक्ष वेधत आहेत.

युझी चहलची पत्नी धनश्री वर्मादेखील आपल्या पतीप्रमाणे प्रसिद्धीच्या झोतात असते. ती नेहमी नवनवीन फोटो पोस्ट करून चाहत्यांचे लक्ष वेधते. धनश्री तिच्या ग्लॅमरस लूकमुळे चर्चेत असते. ती नेहमी नवनवीन फोटो फोटो पोस्ट करून चाहत्यांच्या संपर्कात राहत असते.

चहलची पत्नी धनश्री वर्मा ही पेशाने एक कोरियोग्राफर आहे. ती सोशल मीडियावर नेहमी सक्रिय असते. धनश्री वर्मा तिच्या डान्स स्टेप आणि ग्लॅमरस लूकमुळे चर्चेत असते. चहलप्रमाणे त्याची पत्नी धनश्री वर्माचेही सोशल मीडियावर



खूप फॉलोअर्स आहेत.

धनश्री आणि युझवेंद्र यांची ओळख नृत्याचे धडे घेत असताना झाली. धनश्री वर्मा एक लोकप्रिय डान्सर आहे, ती अनेकांना नृत्यांचे धडे देत असते. आपल्या डान्स स्टेप्स आणि ग्लॅमरस लूकमुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेली धनश्री नेहमी तिचे नवनवीन फोटो शेअर करत असते. नृत्यकला शिकताना या दोघांचा संवाद वाढला आणि डिसेंबर २०२०मध्ये दोघांनी लग्न केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com